**कर्तृत्वाची दखल!**

'कर्मचारी टाइम्स' मध्ये शासकीय कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तृत्वाची, कामगिरीची, प्रेरणादायी कार्याची माहिती फोटोसह पाठवावी. योग्य मजकूरास प्रसिद्धी दिली जाईल. ईमेल : karmacharitimes@gmail.com WhatsApp: ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६.



# कर्मचारी टाइम्स

शासकीय कर्मचाऱ्यांचा हितरक्षक कर्मचारी टाइम्स

• मुंबई , फेब्रुवारी २०२३ • वर्ष - १, अंक - १, • पाने ८ • किंमत १० रुपये फक्त.

शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त.

www.karmacharitimes.com • संपादक - श्री. एम. एम. उर्फ भाऊसाहेब पठाण Email - karmacharitimes@gmail.com



'कर्मचारी टाइम्स'

ALL-IN-1 QR CODE

वर्गणीदार व्हा...


## शासकीय कर्मचाऱ्यांना बक्षींच्या अहवालाचे बक्षिस

### मुख्यमंत्री - उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन

### कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण

**भविष्यातदेखील कर्मचाऱ्यांचे प्रश्न झपाट्याने सुटतील, अशी अपेक्षा**

**मुंबई : महाराष्ट्र राज्य शासनात कार्यरत असलेल्या राज्य कर्मचाऱ्यांसाठी सरकारने माजी अतिरिक्त मुख्य सचिव के. पी. बक्षी आयोगाच्या समितीचा अहवाल स्विकारून २४० कोटी रुपयांची वार्षिक अतिरिक्त वाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्वरित या अहवालाला स्विकारून कर्मचारी वर्गाला दिलासा दिला आहे, त्याबद्दल समस्त कर्मचारी वर्गाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहेत. दोघांनीही आतापर्यंत कर्मचारी वर्गाच्या हिताचे निर्णय झपाट्याने घेतले आहेत, त्यामुळे कर्मचारी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. येणाऱ्या भविष्यातदेखील कर्मचाऱ्यांचे प्रश्न ते सोडवतील, असा आशावाद व्यक्त होत आहे.**

**राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या वतीने वारंवार याबाबत शासनाचा पाठपुरावा केला होता. त्यामुळे या शिफारशी लागू केल्यामुळे संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे संघटनेचे नेते भाऊसाहेब पठाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून आभार व्यक्त करण्यात आले आहे. दरम्यान या प्रक्रियेत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष अशोक दगडे आणि सरचिटणीस विश्वास काटकर यांचीही महत्वाची भूमिका होती. या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नातून हे साध्य झाले आहे.**



सातव्या वेतन आयोगानुसार वेतन वाढीतील त्रूटी दूर करण्यासाठी बक्षी समितीच्या शिफारशींचा दुसरा खंड शासनाला सादर करण्यात आला. त्यानुसार ४ टक्के महागाई भत्ता वाढ केली असून हा आकडा आता ३८ टक्के इतका आहे. राज्य सरकारमधील समकक्ष पदांना आता केंद्र सरकारनुसार वेतन मिळणार आहे. १२२ संवर्गातील लाखो कर्मचारी तसेच अधिकारी यांना ही वेतनवाढ मिळणार आहे. त्याचबरोबर ५४०० पेक्षा ग्रेड पे असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्रानुसार तीन खात्रीशीर प्रगती योजनांचादेखील लाभ मिळणार आहे. त्यासाठी सरकारच्या वतीने २४० कोटी रुपयांची तरतूद केली जाणार आहे.

बक्षी समितीने ३,७३९ मागण्यांवर विचार करून त्यानुसार चर्चा व विचारविनिमय केला आहे. वेतनवाढीमध्ये राज्य सरकारने जवळपास सर्व विभागातील काही पदांच्या वेतनात तफावत केली तर सरकारी अधिकारी व कर्मचारी यांच्या रोष निर्माण झाला असता. तो होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. अनेक समतुल्य पदांवर वेगवेगळे वेतन असल्यामुळे काम एक, दर्जा एक, अधिकार एक पण पगार मात्र वेगळा अशी परिस्थिती होती. आता वेतन सुधारणामुळे प्रथम ते चतुर्थ श्रेणी वर्गात पगाराच्या निम्म्या फरकांसह वेतन दिले जाणार आहे. तसेच त्यानुसार पदोन्नतीदेखील होईल. १ जुलै २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत तसेच जानेवारी महिन्यातील थकीत पगारासह ते लवकरच दिले जाईल, अशी अपेक्षा आहे. शिफारसी स्विकारताना अन्य मागण्या देखील मान्य करण्यात याव्यात, अशी अपेक्षाही कर्मचारी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

## विशेष संपादकीय

## मुळारंभ आरंभ तो....

सार्वजनिक क्षेत्रात वावरताना प्रसारमाध्यम हे संवादासाठी फार महत्वाचे साधन आहे. काळानुरुप ही माध्यमे बदलत गेली असली तरी त्यातून संवाद हा महत्वाचा विषय आहेच आणि आजच्या समाजमाध्यमाच्या काळात त्या-त्या दरम्याच्या घडामोडींबाबत हे माध्यम संवाद साधण्यासाठी प्रभावी दिसून येत आहे. मात्र तरीही **'कर्मचारी टाइम्स'** सुरु करण्याची संकल्पना ही प्रत्यक्षात साकारण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. महाराष्ट्र राज्याच्या सेवेत असलेल्या सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांची संख्या लाखोंमध्ये आहे. त्या कर्मचारी वर्गाला त्यांच्या हक्काचे व्यासपीठ तसेच त्यांचा हितरक्षक म्हणून कार्य करण्याचा त्यामागचा हेतू आहे. हे व्यासपीठ म्हणजे त्यांचे नियतकालिक आणि संवादाचे प्रभावी माध्यम राहणार आहे. संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचारी वर्गाची अवस्था आजच्या सारखी नव्हती. त्यांना तुटपुंजे वेतन तसेच कमालीचे कष्ट सहन करावे लागत होते. खासगी क्षेत्रात उत्तम पगार आणि शासकीय सेवेत कमी वेतन अशी अवस्था त्या काळात होती. म्हणून सरकारी कर्मचारी वर्गाची अवहेलना होत होती. हीच परिस्थिती आज वेतनाच्या बाबतीत समाधानकारक असली तरी आजही अनेक प्रश्नांसाठी लढा द्यावा लागत आहे. शासकीय कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. त्यावर दीर्घकाळ लढा दिला जात आहे. मात्र आजही त्यांची सोडवणूक होताना दिसून येत नाही. याची दखल प्रसारमाध्यमांकडूनही घेतली जात नाही. अनेकदा सर्व संघटनांचे प्रतिनिधी त्यांच्यापर्यंत आपल्या व्यथा मोठ्या अपेक्षेने घेऊन येत असतात. पण त्यांना याबाबत त्यांच्या प्रसारमाध्यमांमध्ये अपेक्षित स्थान मिळत नाही. ते प्रश्न तसेच दुर्लक्षित राहिले जातात. अनेक कर्मचाऱ्यांची याबाबतची व्यथा होती. त्यामुळे आता त्यांना त्यांच्या हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठीच त्यांचेच वृत्तपत्र सुरु करण्याचा निर्णय आम्ही घेतला. चाकोरीबाहेर जावून काम करण्यासारखा हा प्रकार होता. कारण महाराष्ट्र शासनाचा कर्मचारी वर्ग हा सकाळ ते संध्याकाळपर्यंत

➪ पान ४ वर

## सरकारी कर्मचारी चळवळीचे भीष्माचार्य र. ग. कर्णिक



**महाराष्ट्र राज्यातील सर्व सरकारी कर्मचारी वर्गाचे श्रद्धास्थान तसेच कर्मचारी चळवळीचे भीष्माचार्य समजले जाणारे दिवंगत नेते र. ग. कर्णिक यांची २७ जानेवारी या दिवशी जयंती साजरी होते. हा दिवस शासकीय स्तरावर साजरा करण्यात यावा तसेच त्यांच्या नावे दरवर्षी शासकीय पुरस्कारदेखील उत्कृष्ट कर्मचाऱ्यांस दिला जावा, या मागणीसाठी कर्मचारी वर्ग प्रयत्नशील आहे. तसे झाले तरच खऱ्या अर्थाने ती कर्णिक साहेबांना आदरांजली ठरणार आहे.**

महाराष्ट्र राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या समस्या व प्रश्न तसेच जिव्हाळ्याच्या मागण्यांसाठी तब्बल २५ मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीत अथक परिश्रम करणारे तसेच राज्य सरकारी कर्मचारी संघटनेची मुहूर्तमेढ रोवणारे या सरकारी कर्मचारी चळवळीचे जनक म्हणून आपण र. ग. कर्णिक यांचा सन्मान करताना त्यांचे स्मारक मंत्रालयाच्या नवीन प्रशासन भवन या इमारतीच्या आवारात उभारण्यात यावे. या मागणीसाठी राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या वतीने वांरवार शासनाला निवेदने दिली. जाहीर मागणीदेखील करण्यात आली आहे.

श्री. कर्णिक यांनी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या सरचिटणीस पदावरदेखील तब्बल ५२ वर्षे अथक काम केले आहे.

जवळपास १७ लाखांहून अधिक असलेल्या राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेतून त्यांनी स्वत:हून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला. कामगारांच्या रास्त प्रश्नासाठी लोकशाही मार्गाने संघर्ष करायचा पण ते तुटेपर्यंत ताणायचे नाही, या धोरणाने आक्रस्ताळी भूमिका न घेता संयमाने र. ग. कर्णिक यांनी सरकारी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सरकार दरबारी मांडून ते सोडवून घेतले. परिणामी केंद्राच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या सुधारित वेतन

➪ पान ४ वर

## दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची दमदार वाटचाल : रमेश लव्हांडे

**मुंबई :** दि महाराष्ट्र मंत्रालय को - ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी संस्थेच्या संचालक मंडळावर एकता पॅनेलचे सर्व उमेदवार संचालक म्हणून निवडून आल्यानंतर दमदार वाटचाल सुरू झाली आहे. त्यामुळे विरोधक हवालदिल झाले असून त्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून खूप अडथळे आणण्याचा केविलवाणी प्रयत्न सुरु केला आहे. मात्र, स्वच्छ, पारदर्शी, भ्रष्टाचारमुक्त आणि ग्राहकांसाठी स्नेही कारभारामुळे या संस्थेची यापुढील काळात वाटचाल अधिकाधिक प्रगतीपथावर राहिल, असा ठाम विश्वास चेअरमन रमेश लव्हांडे यांनी व्यक्त केला आहे.



MMCCS

महाराष्ट्र मंत्रालय दि महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची स्थापना १० मे १९२९ रोजी जुने सचिवालय येथे १०० राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन केली होती. त्यावेळी शासकीय कर्मचारी वर्गाची आर्थिक निकड विचारात घेऊन ही संस्था सुरु झाली. अल्पावधीत त्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थैर्य देण्याचे काम सुरु केले. त्याकाळी राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना तुटपुंजे वेतन मिळत असे. अशावेळी त्यांच्या मदतीने ही संस्था आली. त्यानंतर आता लवकरच ही संस्था शतकपूर्तीकडे जात असतानाही संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थिरता प्राप्त करून देण्याचा वसा कायम ठेवला आहे. नव्या संचालक मंडळाने अधिक सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून सभासदांचा विश्वास वाढला आहे.

भाऊसाहेब पठाण यांच्या नेतृत्वाखालील एकता पॅनेलने ज्यावेळी संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उभे केले. तेव्हा सभासदांमध्ये त्यांना योग्य पर्याय मिळाल्याची भावना दिसून आली. त्यामुळे महाराष्ट्रभर विस्तार असलेल्या या संस्थेच्या सर्व शाखांमधील सभासदांनी भरघोस मतदान करत सर्वच्या सर्व म्हणजे १५ उमेदवार संचालक मंडळावर निवडून दिले. यात भाऊसाहेब पठाण, राजेंद्र चव्हाण, श्रीकांत काळे, गौतम कांबळे, रमेश

➪ पान ७ वर

## अभिनंदन!

**चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत मुख्यमंत्री सकारात्मक असून लवकरच त्याबाबतचा निर्णय जाहीर करणार आहेत, अशी माहिती त्यांचे प्रतिनिधी, माजी आमदार किरण पावसकर यांनी दिली. राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या प्रयत्नांना यश मिळत आहे. संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी सोमवार दिनांक २३ जानेवारी २०२३ रोजी मंत्रालयातील परिषद सभागृह मधील आयोजित महासभेत किरण पावसकर यांनी ही माहिती दिली आहे.**

(सविस्तर वृत्त पान ३ वर)

## राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) वर्गासाठी विधानपरिषद सदस्यत्व द्यावे : सुरेश आहेरकर

**मुंबई :** राज्य सरकारी सेवेतील चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गाचे प्रश्न अधिक प्रभावीपणे सोडविण्यासाठी त्यांच्या प्रतिनिधीला विधानपरिषद सदस्यत्व देण्यात यावे, अशी जाहीर मागणी राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे उपाध्यक्ष सुरेश सोनाजीराव आहेरकर यांनी केली आहे.

महाराष्ट्र राज्यात सर्व घटकातील व वेगवेगळ्या पक्षाचे सदस्य विधिमंडळात आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था, पदवीधर, मागासवर्गीय, शिक्षक, खेळाडू, सांस्कृतिक क्षेत्र या घटकांसाठी विधान परिषदेत सदस्य आहे. त्यांच्या मार्फत या घटकांचे प्रश्न विधिमंडळातील सर्व आयुधे वापरून सोडविले जातात. मात्र ज्या राज्यात सुमारे ३.५ लाख चतुर्थश्रेणी कर्मचारी आहेत. मात्र विधिमंडळात त्यांच्या प्रतिनिधीला स्थान नाही. या कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत, त्यात अनेक संवेदनशील बाबींचाही समावेश आहे. ते सोडविण्यासाठी विधिमंडळाचा मार्ग प्रभावी आहे. त्यामुळे त्यांना तिथे स्थान मिळणे आवश्यक आहे, असेही सुरेश आहेरकर यांनी म्हटले आहे.

## बेमुदत संपाबाबत १७ फेब्रुवारीला सभा

**औरंगाबाद :** राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती या संघटनेच्या वतीने बेमुदत संप आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर निर्धार सभेचे आयोजन १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता औरंगाबाद जिल्हा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले आहे.

एनपीएस रद्द करा, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा व इतर मागण्यांबाबत बेमुदत संप आंदोलन आहे, अशी माहिती राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस विश्वास काटकर तसेच उपाध्यक्ष व समन्वयक डॉ. देविदास जरारे यांनी दिली आहे.

## कर्मचारी आंदोलनाच्या मानसिकतेत

### अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून बेमुदत संप : भाऊसाहेब पठाण

**मुंबई :** राज्य सरकारी गड ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या वतीने चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून आंदोलन करण्याच्या मानसिकेतत कर्मचारी आहेत. तरी महाराष्ट्र शासनाने वेळीच लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

संवर्ग ३ आणि ४ मधील कर्मचारी मिळून एकत्रित आंदोलन करण्याचा निर्णय नाशिक येथील ७ जानेवारी २०२३ रोजी झालेल्या राज्य कार्यकारिणीत घेतल्यामुळे यापूर्वी जाहीर केलेले १ फेब्रुवारी २०२३ पासूनचे बेमुदत आंदोलन हे तूर्तास स्थगित करण्यात आले आहे. यापूर्वीदेखील कर्मचाऱ्यांनी निदर्शने, एक दिवसाचा संप अशी आंदोलने करून शासनाचे लक्ष वेधले आहे.

त्यामुळे आता शासनाने दखल घेऊन मागण्यांची पूर्ततेसाठी त्वरित योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

➪ पान ७ वर

## इतिहासाची पाने उलटताना...

**अनंत चव्हाण**

एक वेळ अशी होती की सरकारी कर्मचारी म्हणजे ''मुकी विचारे - कुणी हाकारे'' या अवस्थेत राबराब राबीत होते. तेव्हा भारतात ब्रिटीश राज्य करीत होते. भारतातील प्रत्येक नागरिक गुलामगिरीच्या जोखाडा-खाली वावरत होता. विसाव्या शतकाच्या प्रारंभास देश स्वतंत्र करण्यासाठी स्वतंत्र संग्रामाने चांगलाच जोर धरला होता. प्रत्येकजण स्वतंत्र्यासाठी आसुसलेला होता. १९२० साली देशातील कामगार वर्ग - संघटित होण्यासाठी धडपडत होता. गिरणी कामगार, गोदी कामगार यांच्यासह अनेक कामगार न्यायासाठी आपली मुस्कटदाबी सोडून आवाज उठवू लागले होते.

चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांला १९२६ साली प्रथमचं बॅरिस्टर झाबवाला यांच्या नेतृत्वाखाली संघटीत होऊन त्यांनी ब्रिटीश सरकारच्या जुलमाविरुध्द आवाज उठवून होणाऱ्या अन्यायाची सरकारला जाणीव करुन दिली होती आणि सरकारी कर्मचाऱ्यांलाही संघटित होता येते हा इतिहास त्यांनी निर्माण केला.

१९४७ साली भारत देश स्वतांत्र झाला. महाराष्ट्र राज्याची निर्मिती होण्यापूर्वी मुंबई राज्य अस्तित्वात होते. इंग्रजी साहेब निघून गेले तरी भारतीय अधिकाऱ्यांच्या साहेबी थाटात काहीच बदल झाला नव्हता. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना अगदी कमरे इतके वाकून साहेबाला मूजरा करावा लागत होता. अल्प वेतनामुळे लाचारीचे जीवन जगावे लागत होते.

मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर होते तर गृहमंत्री अत्यंत कडक शिस्तीचे, कठोरवृत्तीचे कै. मोरारजी देसाई होते. १९५६ च्या सुमारास सचिवालय व जवळपासच्या कार्यालयातील च.श्रे.कर्मचाऱ्यांनी जुन्या सचिवालयासमोर चहाच्या कपबश्या फोडून आपला प्रक्षोम प्रकट करून सन्मानाने जगण्यासाठी १ले आंदोलन करण्याचे धैर्य दाखविले. अन्यायाला प्रसंगी रस्त्यावर उतरुनही वाचा फोडता येऊ शकते ही शिकवण राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना देऊन त्यांनी पुन्हा एकदा इतिहास घडविला.

च.श्रे.कर्मचाऱ्यांचे हे धारिष्ठय पाहून १९५६ मध्ये काही तृतीयश्रेणी (बाबू) वर्गातील मंडळीनी संघटित होण्याचा प्रयत्न सुरु केला. पण सरकारला वूणवूण लागली आणि त्यांनी या चळवळीचा कणाचं मोडून टाकला. या दहशतीची भीती कर्मचाऱ्यांच्या मनात खोलवर रूजली व संघटित होण्यास दबकू लागली. त्याचवेळी च.श्रे.कर्मचारी होणाऱ्या अन्यायाविरुध्द आक्रमकपणे रस्त्यावर उतरुन निषेध नोंदवित होते. याचवेळी मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र झालाचं पाहीजे हे आंदोलन संपूर्ण सुरु होते.

या आंदोलनाची तीव्रता वाढत चालली होती. गिरणी, कामगार आघाडीवर होता. १०५ हुतात्मांच्या बलिदानात कामगार वर्गाची संख्या जास्ती होती. कामगाराच्या रक्तपातातून १ मे १९६० रोजी महाराष्ट्र निर्मितीनंतर

➪ पान ४ वर

## शिक्षकांनी केले पेन्शनसाठी आंदोलन

**मुंबई :** नगरपालिका व महानगरपालिका शिक्षकांना जुनी पेन्शन मिळाली पाहिजे, या आणि इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघ यांच्या वतीने आझाद मैदानात एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यात रायगड, सातारा, सांगली, अकोला, वाशिम, गडचिरोली, नांदेड, नंदुरबार, धुळे, जळगांव, चंद्रपूर आणि लातूर तसेच नाशिक येथील शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सरकारने मागण्यांचा विचार करावा, अन्यथा यापेक्षा मोठे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिक्षक संघाचे कराड जिल्हा अध्यक्ष अर्जुन कोळी यांनी सांगितले.

## अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेच महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांची दमदार कामगिरी

### जय त्रिपुरसुंदरी !!

(भरत लब्दे)

शासकीय कर्मचाऱ्यांच्या कला व क्रीडागुणांना वाव देण्यासाठी केंद्र शासनामार्फत अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धांचे आयोजन केले जाते. ज्यामध्ये सर्व राज्यातील शासकीय कर्मचारी भाग घेतात व आपले कलाक्रीडा गुण दाखवतात आणि त्यांच्या राज्याची पताका फडकवत ठेवतात. स्पर्धेत ॲथलेटीक्स, हॉकी, जलतरण, कॅरम, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, बुद्धिबळ इत्यादी स्पर्धा नित्यनेमाने वर्षा-दोन वर्षाने होत असतात. जून २०२२ मध्ये पार पडलेली स्पर्धा ही वित्तीय वर्ष २०२१-२२ ची होती. स्पर्धेचे यजमानपद होते त्रिपुरा राज्याकडे.

महाराष्ट्र संघाकरिता संपदा दाते (हिंदुस्थानी शास्त्रीय गायन), विजय नांदेकर (कर्नाटकी शास्त्रीय गायन), ललिता रेंगडे (कर्नाटकी उप शास्त्रीय गायन), अरुण साळंखे (हिंदुस्थानी उप शास्त्रीय गायन), बाळासाहेब सावंत (लोकसंगीत एकल गायन), विजय नांदेकर (पाश्चात्य वादन), अभिजित काटे (पाश्चात्य गायन), विश्राम कुलकर्णी, (शास्त्रीय वादन), राजेश मांजरेकर (उप शास्त्रीय वादन), लोकगीत समूहगायन - सुधीर पालांडे, योगेंद्र केंजळे, अझिम राज, भरत लब्दे, जितेंद्र धनू, दिलिप मोहरे, उषा धनू, मीना सोलापुरे आणि अक्षया बनसोडे (शास्त्रीय नृत्य), उमेश कांबळे (लोकनृत्य एकल), वर्षा रोठे (पाश्चात्य नृत्य), लोक समूहनृत्य - उमेश कांबळे, प्रसाद पवार, विशाल जाधव, स्वप्नील गायकवाड, मंगल नाखवा, वर्षा रोठे, नम्रता वैष्णव, धनश्री चव्हाण आणि यांची निवड झाली. लघुनाटच्याकरिता अरविंद शेटे, मंगल नाखवा, मच्छिंद्रदेव कांगणे, यतीन तोसकर, अपर्णा जाधव, प्रियंका माने, देवयानी नगरकर, प्रियंका ठाकरे, शुभांगिनी पाटील, निलेश गवळी, देवदत्त राऊत, निलिन चांदोरकर, सुर्यकांत गोळे, विकास गव्हाणे, दिवाकर मोहिते, भास्कर बनसोडे यांची निवड झाली.

महाराष्ट्र संघात एकूण ३५ कलाकार होते. अखिल भारतीय नागरी सेवा संगीत, नृत्य व लघुनाट्यय स्पर्धा रबिंद्रभवन या ठिकाणी होणार होती. कर्नाटकी शास्त्रीय संगीतामध्ये विजय नांदेकर यांनी केलेले कर्नाटकी गायन लोकांना अचंबित करुन गेले. कर्नाटकी उप शास्त्रीय मध्ये गत दोन स्पर्धेच्या विजेत्या ललिता रेंगडे यांनी कर्नाटकी भजन सादर करुन लोकांना भक्तिरसाने न्हाऊ घातले.

वाद्यसंगीतामध्ये शास्त्रीय वादनात विश्राम कुलकर्णी यांनी रजत पदक मिळवले. राजेश मांजरेकर यांनीदेखील लावणीचा ठेका ढोलकीवर सादर करुन हॉल दणाणून टाकले. हम भी कुछ कम नही, असं म्हणत अष्टपैलू कलाकार

➩ पान ७ वर

## छत्तीसगढ राज्याचा कर्मचाऱ्यांना दिलासा

**रायपूर :** केंद्र सरकारने मधील योगदानाची रक्कम देण्यास नकार दिल्याने छत्तीसगढ राज्य सरकारकडुन मधील कर्मचाऱ्यांचा वाट्याची रक्कम देण्यात येणार आहे. परंतु ज्या वेळी केंद्राकडुन मधील रक्कम परत मिळेल त्या वेळेस राज्याच्या वाट्याची रक्कम आणि कर्मचारी योगदानाची रक्कम राज्य सरकारला परत देणेबाबत वचनपत्र घेण्यात येणार आहेत.

राज्य शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना केंद्र सरकारच्या धर्तीवर वाढीव ४ टक्के महागाई भत्ताबाबत, निर्णय हिवाळी अधिवेशनांमध्ये घेण्यात येणार होता. महाराष्ट्रातही योजना लागू व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## कार्यालयातील कर्मचारी सातत्याने उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ...

**मुंबई :** राज्य शासनाच्या कार्यालयातील कर्मचारी सातत्याने उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी राज्य सरकारकडुन यापूर्वीच नवीन शिस्तपालन नियमावली जाहीर करण्यात आलेली आहे. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडुन राज्य शासकीय कार्यालयासाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करणेबाबत, दि.२४.०२.२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

सदर निर्णयानुसार दि.२१.०२.२०२० पासुन कार्यालयीन कामकाजाच्या वेळांमध्ये सुधारणा करण्यात आलेले असुन, सदर वेळांचे पालन करणे कर्मचाऱ्यांवर बंधनकारक करण्यात आलेले



आहेत. काही ठिकाणी कार्यालयीन वेळांमध्ये आणखीण संभ्रम असल्याने, नागरिकांकडुन तक्रारी करण्यात येतात. याकरीता राज्य शासनाकडुन नविन शिस्तपालन नियमावली जाहीर करण्यात आलेली आहे.

वरील नमुद शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय कार्यालयांच्या कामकाजाची वेळ ही ४५ मिनिटांनी वाढविण्यात आलेली आहे. तर शनिवार व रविवार हे दोन दिवस सुट्टीचे दिवस घोषित करण्यात आलेले आहेत. यामुळे राज्यातील शासकीय कार्यालयांच्या कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ मिनिट असे करण्यात आलेली आहे.

तर सर्व शासकीय कार्यालयांतील शिपाई कर्मचाऱ्यांसाठी कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० मिनिटे अशी करण्यात आलेली आहे. तर दुपारच्या वेळी १ ते २ या वेळांमध्ये जास्तीत जास्त अर्ध्या तासांची भोजनाची सुट्टी अंतर्भूत करण्यात आलेली आहे. यामुळे यापुढील काळात कामावर उपस्थित राहण्याच्या बाबतीत कर्मचाऱ्यांना अधिक सतर्क रहावे लागणार आहे.

## शिक्षक कर्मचाऱ्यांची याचिका

**पालघर :** पालघर जिल्हा परिषदेच्या डहाणू तालूक्यात ३ शिक्षकांनी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय पेन्शन योजनेत सहभागी होण्यासाठी विरोध केल्यामुळे त्यांचे ५ महिन्यांपासूनचे वेतन शिक्षण विभागाने थकित केले आहे. या विरोधात मधुकर चव्हाण, श्रीकांत सुकथे आणि जयवंत गंधकवाड या शिक्षक वर्गानी मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करून सरकारलाच आव्हान दिले आहे.

राज्य सरकारच्या शिक्षण विभागांच्या आयुक्ताने १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या प्राथमिक शिक्षक वर्गाना राष्ट्रीय पेन्शन योजनेच्या तरतूदी लागु केल्या आहेत. त्या अनुषंगाने १९ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय जाहीर झाला. त्यानंतर डिसेंबर २०२१ मध्ये प्राथमिक शिक्षकांवर राष्ट्रीय पेन्शन योजना सक्ती न करण्याबाबत तसेच वेतन न रोखण्याबाबत शिक्षक आमदाराने शिक्षण विभागाला विनंती केली आहे.

त्यावर शिक्षण विभाग आयुक्तांनी पेन्शन योजना आणण्यासाठी कोणावर सक्ती न करण्याचे निर्देश जिल्हा पारिषदांना दिलेले आहे. त्यानंतरही जिल्हा पारिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय पेन्शन योजनेत नोंदणी न करणाऱ्या तसेच खाते न चालू केलेल्या प्राथमिक शिक्षकांचे मानधन रोखण्याचे बेकायदा आदेश काढले होते. ३ शिक्षकांचे ६ महिन्याचे वेतन जुलै महिन्यापासून रोखून ठेवले आहे.

या शिक्षकांनी वकील. शशुंतला सागवीरकर यांच्यामार्फत २२ डिसेंबर २०२२ रोजी न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

याचिकाकर्ते शिक्षक नियमित आणि प्रामाणिकपणे विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे काम करत आहे. त्यांचे वेतन रोखण्याची करवाई जाचक आणि बेकायदा ठरवून ती रद्द करण्यात यावी. जुलै पासून थकीत ठेवलेले वेतन व्याजासोबत परत द्यावे, याबाबत डहाणू पंचायत समिती, पालघर जिल्हा परिषद आणि शिक्षण विभागाला न्यायालयाने निर्देश द्यावे अशी मागणी शिक्षक वर्गाने केली आहे.

पेन्शन तसेच थकीत वेतन या बाबी कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत महत्वाच्या आहेत. त्याबाबत न्याय मिळावा अशी त्यांची अपेक्षा आहे.

## आमदार व माजी मंत्री यांच्या पेन्शनमध्ये वाढ

**मुंबई :** राज्यातील माजी आमदार व माजी मंत्री यांना किमान पेन्शन ठरविण्यात आली असून, किमान पेन्शन ५० हजार रुपये ठरविण्यात आली आहे. सदरचे पेन्शन विधेयक हे ३० कोटी रुपयांचे होते, यास शिंदे सरकारने एकमताने मंजुरी दिली. सध्याच्या आकडेवारीचा विचार केला असता, राज्यामध्ये ६५३ माजी मंत्री व आमदार आहेत. यांना सदर वाढीव पेन्शनचा लाभ मिळणार आहे. आमदार व खासदार हे एकदाच निवडून आले तर त्यांना किमान पेन्शन लागू होते. तसेच जेवढ्या वेळेस निवडून येईल, तेवढ्या प्रमाणात पेन्शनमध्ये वाढ होते. याबाबत जनमानसात अनेक उलटसुलट प्रतिक्रिया-ऐकायला मिळत आहेत.

## नवनियुक्त अभियंत्यांनी लोकहिताची कामे करावीत : मुख्यमंत्री

### १०३२ अभियंत्यांना नियुक्तीपत्र प्रदान

**मुंबई :** राज्य शासनाच्या विविध विभागात नियुक्तीपत्र मिळालेल्या सर्व अभियंत्यांनी प्रामाणिकपणे लोकहिताची कामे करावीत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. स्वातंत्र्याच्या अमृत-महोत्सवी वर्षानिमित्त जाहीर केल्या नुसार येत्या वर्षभरात राज्यात ७५ हजार रोजगार उपलब्ध करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्राचा महासंकल्प कार्यक्रमानिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम आणि मृद व जलसंधारण विभागात १०३२ अभियंत्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्याचा राज्यस्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार राम शिंदे उपस्थित होते.

स्पर्धा परीक्षेतील यशस्वी उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम राज्यात पहिल्यांदाच होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, राज्यात पारदर्शक पद्धतीने आणि गतिमान लोकाभिमुख निर्णय घेतले जात आहेत.

पायाभूत सुविधा आणि विकासकामांसाठी केंद्र सरकारच्या वतीने मोठा निधी उपलब्ध करून दिला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० लाख उमेदवारांना नियुक्तिपत्र देण्याची घोषणा करुन एकच वेळी ७१ हजार नियुक्तीपत्रांचे वाटप केले. त्याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शासनाने ७५ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्याचा महासंकल्प केला आहे.

मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे म्हणाले, मंत्रिमंडळाच्या बैठकीत लोकाभिमुख निर्णय घेण्यात आले आहेत. महाराष्ट्र राज्यातील १५ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिली आहे.

यामुळे राज्यातील हजारो एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. शेतकऱ्यांसाठी आवश्यक असणारे विविध प्रलंबित विषय मार्गी लावण्यात आले. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन ही रथाची दोन चाके आहेत. महाराष्ट्र राज्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सकारात्मक इच्छाशक्तीमुळे युवकांना रोजगार देणे शक्य झाले. न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करत ११४३ पैकी १०३२ अभियंत्यांना नियुक्त्या देण्यात आल्या. उर्वरित १११ उमेदवारांना नियुक्त्या देता आल्या नाहीत.

यापुढे त्यांच्यासाठी न्यायालयात भक्कम व आग्रही बाजू मांडून त्यांच्याही नियुक्तीचा मार्ग काढला जाईल, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली.

मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सामान्य प्रशासन सचिव सुमंत भांगे आदी यावेळी उपस्थित होते.

# लाचखोरीत महसूल विभाग पहिला

## राज्यात १७० प्रकरणांमध्ये २३६ कर्मचारी जाळ्यात

**मुंबई :** राज्यातील महसूल यंत्रणा लाचखोरीत आघाडीवर असून गेल्या वर्षभरात १७० प्रकरणांमध्ये २३६ महसूल कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या (एसीबी) जाळ्यात अडकले. राज्यात आतापर्यंत ७४० लाच प्रकरणांची नोंद झाली असून सुमारे ३ कोटी २२ लाख रुपयांची लाच मागण्यात आली आहे. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या ताज्या अहवाला नुसार १ जानेवारी पासून २८ डिसेंबरपर्यंत लाचप्रकरणी ७१९ सापळे लावले होते, त्यात १०१६ अधिकारी, कर्मचारी अडकले.

भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये महसूलविभाग गेल्या अनेक वर्षांपासून पहिल्या स्थानी आहे. गेल्या वर्षभरात महसूल कर्मचाऱ्यांनी ३१ लाख ५ हजार रुपयांची लाच मागितली होती. त्या खालोखाल पोलीस यंत्रणेचा क्रमांक लागतो. पोलीस विभागातील २२४ जण एसीबीच्या सापळ्यात सापडले आहेत. एकूण १६० प्रकरणांमध्ये लाचेची रक्कम ४२ लाख ४१ हजार होती. महापालिका आणि जिल्हा परिषद यासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये देखील लाचखोरी वाढीस लागली असून महसूल विभागानंतर या स्थानिक स्वराज्य संस्थांशी सर्वसामान्यांचा संबंध येतो.

लाचेची रक्कम तुलनेने कमी असली, तरी लोक या व्यवस्थेत भरडले जातात. आता या कर्मचाऱ्यांच्या विरोधात देखील एसीबीकडे तक्रार करण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. गेल्या



वर्षभरात विविध महापालिकां मध्ये लाचेची ४६ प्रकरणे निदर्शनास आली. यात ७१ जणांनी ६३ लाख ४ हजार रुपयांची लाच मागितली होती. महावितरणचे ६६ भ्रष्ट कर्मचारी ५० प्रकरणांमध्ये एसीबीच्या हाती लागले आहेत. यात ६६ कर्मचाऱ्यांनी १० लाख ३७ हजार रुपयांची लाच मागितली होती. राज्य उत्पादन शुल्क विभागातील केवळ चार कर्मचाऱ्यांना एसीबीने पकडले, त्यांची लाच ४६ हजार रुपयांची होती. गेल्या वर्षीपेक्षा यावर्षी लाच प्रकरणांची संख्या थोडी कमी झाली असली, तरी लाचेची रक्कम कमी झालेली नाही. गेल्या वर्षात भ्रष्ट कर्मचाऱ्यांनी ३ कोटी १० लाख रुपयांची लाच मागितली होती.

**तक्रार संख्येत वाढ...**

लाच प्रकरणांमध्ये तक्रार कर्त्यांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. विशेष म्हणजे या सर्व तक्रारी प्रामुख्याने अनुसूचित जमातींमधील नागरिकांनी केल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यात जागरुकता वाढली असून लाचखोरांना गजाआड करण्यात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. नोटाबंदी नंतर भ्रष्टाचार कमी होईल, ही अपेक्षा होती. ती फोल ठरली. त्यानंतर करोना काळात लाच प्रकरणांमध्ये घट झाली. आता पुन्हा भ्रष्ट कारभार गाजू लागला आहे.

**अशी होते कारवाई...**

राज्यात लाच लुचपत प्रतिबंधक खात्याचे (एसीबी) मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद आणि नांदेड असे आठ विभाग आहेत. सरकारी कर्मचारी लाच घेत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर एसीबी शहानिशा करून संबंधितांवर कारवाई करते. यामुळे कर्मचारी वर्गाने अधिक स्वच्छ व पारदर्शी कारभार करावा, यासाठी प्रशासन अधिक दक्ष झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## हिमाचल प्रदेशमध्ये जुनी पेन्शन योजना

**शिमला :** हिमाचल प्रदेश राज्यामध्ये नवे मंत्रिमंडळ स्थापन झाले असून त्यांनी मंत्रीमंडळाच्या पहिल्याच बैठकीत त्यांच्या १.४ लाख कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू केली आहे. मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुक्खू यांनी लोहरी सणाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय लागू केला आहे.

या निर्णयानंतर शासकीय कर्मचाऱ्यांनी त्याचा जयघोष केला आहे. गेल्या २० वर्षांपासून कर्मचारी या योजनेच्या प्रतिक्षेत होते. त्यांच्यासाठी ही अत्यंत आनंदाची घटना आहे.

छत्तीसगड, राजस्थान तसेच पंजाब राज्यांमध्ये यापूर्वीच ही योजना लागू करण्यात आली आहे. निवडणूक प्रचारात काँग्रेस पक्षाने ही योजना लागू करण्याबाबतचे आश्वासन आपल्या जाहीरनाम्यात दिले होते. त्याची पूर्ती करत सत्तेवर आल्यानंतर लगेचच हा निर्णय लागू करण्यात आला आहे.

## २० हजार अंगणवाडी कर्मचाऱ्यांची भरती



**मुंबई :** राज्यात अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस आणि मिनी अंगणवाडी सेविकांच्या २० हजार १८६ पदांच्या भरतीला मान्यता मिळाली आहे. आता ही भरती लवकरच सुरु करण्यात येईल, अशी घोषणा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे.

त्याचबरोबर मुख्यमंत्र्यांनी असेही स्पष्ट केले आहे की, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधन वाढीसह विमा, अंगणवाड्यांसाठी वर्ग, यांसारख्या सोयीसुविधा पुरवण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

राज्यातील अंगणवाडी सेविकांनी विविध मागण्यांसाठी आझाद मैदान येथे आंदोलन केले होते. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यांचे प्रश्न सोडविण्याचे आवाहन या सेविकांनी केले होते. त्यानंतर विशेष बैठकदेखील आयोजित करण्यात आली. त्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील उपस्थित होते. त्यावेळी निर्णय घेण्यात आले.

## विद्यापीठ कर्मचाऱ्यांची वेतनवाढ कागदावरच

### अस्थायी कर्मचाऱ्यांना पाच महिन्यांपासून फक्त बोळवणच

**मुंबई :** मुंबई विद्यापीठातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीला मंजूरी मिळाली असतानाही गेल्या पाच महिन्यांपासून ती योजना केवळ कागदावरच राहिली आहे.

गेल्या सिनेटच्या शेवटच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ९०० अस्थायी कर्मचाऱ्यांना कार्यपदानुसार वेतनवाढ देण्याचे मंजूर करण्यात आले होते.

एकूण कर्मचाऱ्यांमध्ये कायमस्वरुपी तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांपेक्षा कंत्राटी स्वरुपातील कर्मचाऱ्यांची संख्या अधिक असूनही काही हजार रुपये पगारावर मागील बऱ्याच वर्षांपासून बोळवण सुरु असल्याचे चित्र दिसून येत आहे.

अस्थायी कर्मचाऱ्यांचे हाल नवीन वर्षातही सुरु आहेत. खासगी एजन्सीकडून नेमण्यात आलेल्या सुरक्षारक्षकांचा पगार आणि या कंत्राटी व रोजंदारी पद्धतीवर १५ ते २० वर्षांपासून काम करत असलेल्या सुरक्षा रक्षकांचा पगार यात कमालीचा फरक आहे. समान काम आणि समान वेतन कायदा का लागू केला जात नाही, असा प्रश्न विचारला जात आहे.

शेवटच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत जवळपास सर्व ९०० अस्थायी कर्मचारी न्यायालयात गेले होते. त्यांना वेतनवाढ करण्याचे मंजूर करण्यात आले. २० कोटी रुपयांचा भर असल्याचे दिसूनही हा प्रस्ताव त्यावेळी मंजूर करण्यात आला होता. तरीही वेतनवाढ अद्याप दिली गेली नाही. याबाबत माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रदीप सावंत यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

श्री. सावंत आणि राजन कोळंबेकर यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी याप्रकरणी लक्ष घालून त्वरित योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे.

मात्र, अद्यापही त्याची अंमलबजावणी झाली नाही.

## विविध विभागांमध्ये अधिकारी पदे रिक्त

**मुंबई :** राज्य सरकारच्या विविध विभागांमध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची २.४४ लाख पदे रिक्त असल्याची आकडेवारी उघड झाली असून, गृह विभागात सर्वात अधिक रिक्त पदे असल्याचे दिसते. विविध शासकीय विभागांत अपुरे मनुष्यबळ असल्यामुळे त्याचा अतिरिक्त कामाचा ताण अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांवर पडतो. या कर्मचारी अधिकाऱ्यांच्या संघटनांच्या तक्रारीस यामुळे बळ मिळाले आहे.

महाराष्ट्र सरकारच्या प्रशासनातील एकूण २९ शासकीय विभाग, जिल्हा आस्थापनात मंजूरपदांची संख्या १० लाख ७० हजार ८४० इतकी आहे. यापैकी ८ लाख २६ हजार ४३५ पदे भरलेली आहेत. तर २ लाख ४४ हजार ४०५ पदे रिक्त आहेत, अशी आकडेवारी माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांना सरकारने उपलब्ध करुन दिली. रिक्त पदे त्वरित भरण्यात यावीत, अशी मागणी संघटनांकडूनही करण्यात येत आहे. त्यामुळे ही पदे भरली पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

## तलाठी भरती आणि मंडळ अधिकारी
## पदोन्नती प्रक्रिया लवकरच सुरु : महसूल मंत्री
### ३ हजार ६२८ पदे निर्मितीला राज्य शासनाची मान्यता




**पुणे :** तलाठी भरती आणि मंडळ अधिकारी पदोन्नती प्रक्रिया येत्या काही दिवसांमध्ये सुरु करण्यात येणार आहे. ३ हजार ११० तलाठी आणि ५१८ मंडळ अधिकारी असे एकूण ३ हजार ६२८ पदे निर्माण करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांनी सांगितले.

गेल्या काही वर्षांपासून राज्यात तलाठी पदाच्या अनेक जागा रिक्त होत्या. एकाच तलाठ्याकडे अनेक गावे सोपविण्यात आल्याने कामांना विलंब व्हायचा आणि महसूल यंत्रणेवर ताण येत होता. मंत्री श्री. विखे - पाटील यांनी तलाठी भरती आणि मंडळ अधिकारी पदोन्नती प्रक्रियेला गती मिळावी यासाठी पुढाकार घेतला होता. गावात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा तलाठी याच्याशी संबंध येत असतो. सातबारा, विविध दाखले यासाठी नियमितपणे तलाठी यांच्या संपर्कात राहावे लागते. तलाठी हे पद ग्रामीण भागात अत्यंत महत्वाचे असते. आता होणाऱ्या तलाठी भरतीमुळे सध्या कार्यरत असलेल्या तलाठी वर्गाचा भार कमी होण्यास मदत होणार आहे. साझा पुनर्रचनेनुसार विहित केलेल्या निकषाच्या अनुषंगाने संबंधित विभागीय आयुक्त यांच्याकडून महसुली विभागनिहाय प्राप्त माहितीस अनुसरुन वाटप करण्यात आलेल्या ३ हजार ११० साझे आणि ५१८ महसुली मंडळ कार्यालयासाठी ३ हजार ११० तलाठी भरती आणि ५१८ मंडळ अधिकारी यांची पदोन्नती असे एकूण ३ हजार ६२८ पदे निर्मितीला मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय ७ डिसेंबर २०२२ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. पुणे महसुली विभागा अंतर्गत एकूण ६०२ तलाठी साझे आणि १०० महसुली मंडळे आहेत. अमरावती महसुली विभागाअंतर्गत एकूण १०६ तलाठी साझे आणि १८ महसुली मंडळे आहेत. नागपूर महसूली विभागाअंतर्गत एकूण ४७८ महसुली मंडळे आहेत.

# चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत
# मुख्यमंत्री सकारात्मक : किरण पावसकर
## लवकरच निर्णय जाहीर होण्याची शक्यता

पान १ वरुन ...

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाने केलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक असून लवकरच त्याबाबत निर्णय जाहीर करतील, अशी माहिती माजी आमदार व कामगार नेते किरण पावसकर यांनी दिली.

मंत्रालयातील परिषद सभागृहामधील आयोजित महासभेत सोमवार दिनांक २३ जानेवारी या दिवशी राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांच्या अथक प्रयत्नांतून व मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार त्यांचे प्रतिनिधी, माजी आमदार किरण पावसकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रालयातील परिषद सभागृहात चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघ व





सर्व संलग्न संघटनांच्या राज्यभरातील विभागीय व जिल्हा पदाधिकारी यांची महासभा आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते.

या सभेला राज्यभरातून सुमारे ३०० पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

सभेपुढे खालील मागण्यांवर चर्चा झाली. १) गट-ड (चतुर्थश्रेणी) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरावीत, २) वर्ग-४ (चतुर्थश्रेणी) पदांचे खाजगीकरण/कंत्राटीकरण करू नये, ३) सेवानिवृत्त / स्वेच्छानिवृत्त / मृत गट-ड (चतुर्थश्रेणी) संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांच्या एका पाल्यास शासनसेवेत सामावून घ्यावे, ४) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत असलेल्या

**भाऊसाहेब पठाण यांच्यावर पक्षातील कार्यकर्त्याकडून झालेल्या हल्ल्याबद्दल किरण पावसकर यांनी भर सभेत मोठ्या मनाने आवर्जून क्षमा मागतो, या शब्दात दिलगिरी व्यक्त केली.**

रूग्णालयातील ७३५ बदली कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करावे, ५) सन २००५ नंतर शासनसेवेत रूजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, ६) अनुकंपा भरती विना अट करावी.

उपरोक्त सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा होऊन ह्या सर्व मागण्यांबाबत मुख्यमंत्री महोदयांसोबत चर्चा झाली आहे असे त्यांचे प्रतिनिधी किरण पावसकर यांनी सभागृहात सांगितले. तसेच जुनी पेंन्शन योजना सुरू करण्याच्या व बदली कर्मचाऱ्यांना कायम करणे अशा या मागणीवर सकारात्मक आहेत या दोन मागण्या नक्कीच मान्य होतील, त्याचप्रमाणे वरील उर्वरीत सर्व मागण्या ह्या धोरणात्मक असून त्यादेखील मंजूर होतील असे ठामपणे सांगितले.

एकंदरीत सर्व मागण्यांवर सकारात्मक चर्चा होऊन त्या १००% मान्य होणार यात शंका वाटत नाही, असेही त्यांनी सांगितले.

सभागृहातील उपस्थित मान्यवरांनी चांगला प्रतिसाद दिला त्याबद्दल सर्व उपस्थितांचे उपाध्यक्ष सुरेश आहेरकर यांनी आभार मानले.

खेळीमेळीच्या वातावरणात सभा संपन्न झाली. राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या प्रयत्नांना यश मिळत आहे.

## कोविड -१९ या नवीन आजाराचा समावेश

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य शासनाच्या दि.१९.०३.२००५ च्या शासन निर्णयान्वये शासकीय कर्मचाऱ्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आकस्मिक निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती-करीता आकस्मिक तसेच गंभीर आजारांची प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

कोविड-१९ या नवीन आजाराचा सदर आकस्मिक आजारांमध्ये समावेश करण्यात आला आहे.

सदर यादीतील आकस्मिक आजारांमध्ये म्युकरमायकोसीस या आकस्मिक आजाराचा नव्याने समावेश करण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती. म्युकर-मायकोसीस या नवीन आजारांचा यानुसार सदर यादीत समावेश करण्यात आलेला आहे.

# राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणाली सुरू होणार

**मुंबई :** प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान आणि कागदविरहीत होण्यासाठी १ एप्रिलपासून राज्यभरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणाली सुरु करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले.

केंद्राच्या धर्तीवर राज्यात शासकीय कामकाजाच्या फाईल्स निर्णयासाठी चार स्तरापर्यंतच पाठविण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

केंद्रीय प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार विभागाचे सचिव श्री. व्ही. श्रीनिवास यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची 'वर्षा' निवासस्थानी भेट घेतली. मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी श्री. श्रीनिवास यांचे स्वागत करुन प्रशासकीय सुधारणांच्या क्षेत्रात विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले जात असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

राज्यात सुप्रशासन विषयक मार्ग-दर्शिका (गुड गव्हर्नन्स मॅन्युअल) तयार करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याच्या सूचना देतानाच देशात सुप्रशासन निर्देशांकात द्वितीय क्रमांकावर असलेल्या महाराष्ट्राला प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणालीचा वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येईल, शिवाय कामकाज संपूर्णपणे कागदविरहीत (पेपरलेस) होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे. त्यामुळे येत्या १ एप्रिलपासून राज्याच्या ई-ऑफिस प्रणाली सर्व कार्यालयांमध्ये सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. सर्व कार्यालये ई-ऑफिस वापरू लागले की मोबाईलवर कामकाजाच्या फाईल्स, कागदपत्रे पाहता येतील, त्याला मान्यता देता येणार आहे.

### फाईल्सचा प्रवास कमी

सध्या मुख्यमंत्र्यांकडे निर्णयासाठी येणारी फाईल ८ विविध स्तरांमधून येते, या अधिकच्या स्तरांमुळे संबंधित विषयांच्या फाईल्सवर निर्णय होण्यास विलंब लागतो, म्हणून गतिमान कारभारासाठी फाईल्स सादर करण्याचे स्तर कमी करण्याच्या सूचना देतानाच चार स्तरांवरुनच फाईल मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेसाठी पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले.

### ऑनलाईन सेवा वाढणार

ई-सेवा निर्देशांकात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आणण्यासाठी जास्तीत-जास्त सेवांची संख्या वाढविण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या. सध्या राज्यातील ४५० सेवा ऑनलाईन दिल्या जात आहेत.

### तक्रारींवरील आढावा

हे जनतेचे सरकार असून सर्वसामान्यांच्या शासना कडून असलेल्या अपेक्षापूर्ती साठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे प्राप्त होणाया सार्वजनिक तक्रारीं च्या निवारणासाठी ऑनलाईन यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. या तक्रारींचे डिजिटल ट्रॅकिंग करण्यात येईल, तक्रारींवर विभागांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यासाठी एक स्वतंत्र डॅशबोर्ड तयार करण्यात येणार आहे. या सार्वजनिक तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीचा स्वत आढावा घेणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी जाहीर केले.

### गुड गव्हर्नन्स रँकिंग

सध्या महाराष्ट्रात फक्त राज्यस्तरावर सुशासन पद्धतीचे पर्यवेक्षण होते, आता शासनाच्या प्रत्येक विभागांची आणि जिल्ह्यांची गुड गव्हर्नन्स रँकिंग केली जाणार आहे. शासकीय विभाग आणि जिल्ह्यांच्या प्रशासनाद्वारे दिल्या जाणाया शासकीय सेवांची, सुशासनाची क्रमवारी निश्चित करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. या सुशासनाच्या क्रमवारीमुळे विभागांमध्ये आणि जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये स्पर्धा निर्माण होईलच, शिवाय जनतेला मिळणाऱ्या सेवांचा दर्जा वाढेल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

### यशोगाथांचे संकलन

राज्याच्या प्रशासनात सुरू असलेल्या अभिनव, नाविन्यपूर्ण प्रयोगांच्या यशोगाथांचे संकलन केंद्रीय प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार विभागाच्या वतीने करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील विशेष कार्य केलेल्या ५० प्रयोगांची निवड केली जाणार असल्याचे सचिव श्री. श्रीनिवास यांनी सांगितले.

या ई- प्रणालीचा उपयोग अधिकाधिक प्रभावीपणे होण्यासाठी कर्मचारी वर्गदेखील उत्सुक आहे. मात्र हे करत असताना सुरूवातीच्या काळात काही अडचणी किंवा तांत्रिक बाबींच्या पूर्तीचा अडथळा आल्यास मात्र त्याबाबत प्रशासन व कर्मचारी यांच्यात समन्वय व सुसंवाद असायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान ई - ऑफिस प्रणाली लागू केल्यानंतर नक्कीच राज्याच्या कारभारात अधिक वेग येईल.

जनतेची कामे झपाट्याने होतील. सध्याचा जमाना हा ई-प्रणालीचा असून खासगी क्षेत्रात अधिक प्रभावीपणे लोकांच्या सेवेसाठी त्याचा उपयोग होताना दिसून येतो.

राज्य शासनानेही त्याचा अवलंब केल्यानंतर त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील.

सध्याच्या पद्धतीमुळे वेगवेगळ्या विभागात जनतेच्या प्रश्नांचा तसेच त्यांना देण्यात येणाऱ्या सेवांच्या बाबतीत अधिकाधिक सुधारणा होईल, असा विश्वास सामान्यांकडून व्यक्त होताना दिसून येत आहे.

पारदर्शी, स्वच्छ कारभार, विलाविलंब कार्यामुळे खासगी क्षेत्राच्या तुलनेत कारभार अधिक परिणामकारक होईल, असा विश्वास सर्वसामान्यां-कडून व्यक्त होत आहे.

# अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बदल्या

**मुंबई :** अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बदल्यांच्या संदर्भात आरोग्य विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे आरोग्य विभागाच्या सर्व बदल्या ऑनलाईन ॲपच्या माध्यमातून होणार आहेत. आरोग्य विभागाच्या बदल्यांच्या संदर्भात शिफारसपत्र चालणार नाही. बदल्यांमागील अर्थकारण थांबवण्यासाठी आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांनी निर्णय घेतला आहे.

अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी महाराष्ट्र आरोग्य विभाग अद्यावत डिजिटल ॲप तयार करणार आहे. ज्याला बदली करुन घ्यायची आहे त्याने स्वतः या ॲपवर तीन पर्याय द्यायचे आहेत. त्यामधून मेरिटवर डिजिटल पद्धतीने बदली होणार आहे, असं आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी बोलताना सांगितलं.

### बदल्या ॲपद्वारे करणार

अ पासून ड दर्जापर्यंत सगळ्यांच्या म्हणजे अगदी संचालक पदापासून एमबीबीएस डॉक्टर, जिल्हा रुग्णालयातील नर्सेस पदापर्यंतच्या बदल्या आम्ही ॲपद्वारे ऑनलाईन करणार आहोत. कोणाची चिठ्ठी नाही, कोणाचा वशिला नाही, कोणाला भेटायचं नाही. एक ॲप डेव्हलप केलेलं असेल, महाराष्ट्र शासनाच्या नियमा प्रमाणे ज्याला तीन वर्षे झाले आहेत, त्याचं सध्याचं जे ठिकाण आहे, ते सोडून त्याने स्वतःच्या आयडी वरुन तीन प्रेफरन्सेस द्यायचे. हे ठिकाण सोडल्यानंतर त्याला कोणतं ठिकाण अपेक्षित आहे, कुठलं ठिकाण हवं आहे.

त्याचे तीन पर्याय द्यायचे. आम्ही एक ठराविक कालावधी दिला आहे. यामध्ये त्याने हे पर्याय अपलोड करायचे. या कालावधीनंतरही प्रोसेस संपेल आणि कुठे बदली झाली हे त्याच्या आयडी वर दिसेल. तिथेच त्याला कळेल की या ठिकाणी बदली झाली, असं तानाजी सावंत यांनी सांगितलं.

महाराष्ट्रात पहिल्यांदाच हे धोरण राबवलं जात आहे. हे धोरण पारदर्शक आहे. यामुळे इथे काम करणारे लोक समाधानी होतील. यामुळे त्याचा आत्मविश्वास, स्वप्रेरणा वाढेल. यामधून वादनिर्माण होण्याचा संबंधच नाही, असं ही तानाजी सावंत यांनी नमूद केलं.

### ३० टक्के व्हेकन्सी

आरोग्य विभागातील भरती प्रक्रिये बाबत तानाजी सावंत म्हणाले की, "आरोग्य विभागातील भरतीसाठी धोरण राबवणार आहोत. राष्ट्रीय स्तरावर भरती राबवण्यासाठी ज्या एजन्सी आहेत, टीसीएस, इन्फोसिस, एमकेसीएल यांनी कोट्यावधी विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन परीक्षा एकाच वेळी राबवल्या आहेत, त्या एजन्सी आपल्या कडे डेप्युट करायच्या आणि त्यांच्या माध्यमातून भरती प्रक्रिया राबवली जाईल. एनएचएमच्या साडेचार ते पाच हजार जागा रिक्त आहे. तर आरोग्य विभागाच्या साडे चार ते पाच हजार जागा रिक्त आहे. माझ्या विभागाच्या एकूण ३० टक्के जागा रिकाम्या आहेत."

## औरंगाबाद कृषी विभाग आलाय मेटाकुटीला

**औरंगाबाद :** औरंगाबाद येथील चतुर्थश्रेणी कर्मचारी बंद असल्यामुळे कृषी विभाग मेटाकुटीला आला आहे. या ठिकाणी असलेला कर्मचारी वर्ग सध्या मोठ्या तणावाखाली काम करत आहे.

याबाबत संबंधितांकडून कुठलीही दखल घेतली जात नाही. कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रशासन संवेदनशील नसल्याची देखील चर्चा कर्मचारी वर्गात ऐकायला मिळत आहे.

जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी व तालुक्यात अनेक कर्मचाऱ्यांना लिपिकाचेही काम करावे लागत आहे. वाहन चालकांचीही परिस्थिती अशीच आहे. एका वाहनचालकास दोन-दोन वाहने चालवावी लागत आहेत. त्यामुळे कर्मचारी तसेच वाहन चालक यांची या ठिकाणी रिक्त असलेली पदे त्वरित भरण्याची गरज आहे.

ही पदे तत्काळ भरण्यात यावी, अशी मागणी कर्मचारी एकनाथ लांडगे (मामा) यांनी केली आहे.

# लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने तरतुदींचा समावेश असावा : उपमुख्यमंत्री

**मुंबई :** लाड-पागे समितीने केलेल्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना हक्कांनुसार रोजगार उपलब्ध करून दिला जातो. वारसा हक्कांची सरकारच्या वतीने प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असून त्यासाठी प्रारूप आराखडा सादर करावा, असे निर्देश महाराष्ट्र राज्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



लाड समितीच्या वतीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमल-बजावणी बाबत सुधारित तरतुदींच्या अनुषंगाने उप-समितीस सादरीकरण सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्याचे बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, महात्मा फुले विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक बिपिन श्रीमाळी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजीव जयस्वाल आदी उपस्थित होते.

राज्य उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, शासकीय, निमशासकीय, तसेच महानगरपालिका, नगरपालिका, कटकमंडळे, नगरपरिषद, राज्य शासनाची महामंडळे, राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था, अनुदानित संस्थांच्या आस्थापनांमध्ये कार्यरत असलेल्या सफाई कामगारांची सेवानिवृत्ती, मृत्यू, स्वेच्छा निवृत्ती किंवा त्यांना वैद्यकीय दृष्टीने अपात्र ठरविल्यानंतर कामगारांचे आर्थिक नुकसान होऊ नये, कुटुंब बेघर होऊ नये, त्यांना संरक्षण मिळण्यासाठी लाड समितीच्या शिफारशीनुसार संबंधित कामगाराच्या जागी त्याच्या वारसाची नियमानुसार वारसा हक्काने नियुक्ती करण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यासाठी यापूर्वीच विविध सूचना देण्यात आल्या आहेत.

लाड समितीने सफाई कामगारांच्या वारसास वारसा हक्काने नियुक्ती अनुषंगाने शिफारशीस अनुसरून सर्व शासन निर्णयांचे एकत्रीकरण करून सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता.

त्यानुसार मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सर्वसमावेशक आणि सफाई कामगारांच्या हितांना प्राधान्य देणाऱ्या प्रारुप तरतुदींचा समावेश करावा, असेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मंत्री श्री. भुसे यांनीही विविध सूचना केल्या. सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य विभागाचे सचिव श्री. भांगे यांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्क अंमलबजावणी बाबत सुधारित तरतुदींची सविस्तर माहिती दिली.

दरम्यान महाराष्ट्र राज्य शासकीय पातळीवर हालचाल होत असल्यामुळे राज्यात सफाई कामगार वर्गात समाधान व्यक्त होत आहे.

विशेष संपादकीय

# मुळारंभ आरंभ तो....

पान १ वरुन ...

वावरताना प्रसारमाध्यम हे संवादासाठी फार महत्वाचे साधन आहे. काळानुरूप असली तरी त्यातून संवाद हा समाजमाध्यम अत्यंत प्रभावी झाले आहे, हे दिसून येते. त्या घडामोडींबाबत संवाद साधण्यासाठी प्रभावशाली आहे. हे नियतकालिक सुरु करण्याची अभिवन संकल्पना प्रत्यक्षात यावी, यासाठी कार्यवाही करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. महाराष्ट्र राज्याच्या सेवेत असलेल्या सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांची संख्या लाखोंमध्ये आहे. त्या कर्मचारी वर्गाला त्यांच्या हक्काचे व्यासपीठ तसेच त्यांचा हितरक्षक म्हणून कार्य करण्याचा त्यामागचा हेतू आहे. हे व्यासपीठ म्हणजे त्यांचे नियतकालिक आणि संवादाचे प्रभावी माध्यम राहणार आहे. संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचारी वर्गाची अवस्था आजच्या सारखी नव्हती. तुटपुंजे वेतन तसेच कमालीचे कष्ट सहन करावे लागत होते. खासगी क्षेत्रात उत्तम पगार आणि शासकीय सेवेत कमी वेतन अशी अवस्था त्या काळात होती. म्हणून सरकारी कर्मचारी वर्गाची अवहेलना होत होती. हीच परिस्थिती आज वेतनाच्या बाबतीत समाधानकारक असली तरी आजही अनेक प्रश्नांसाठी लढा द्यावा लागत आहे. शासकीय कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. त्यावर दीर्घकाळ लढा दिला जात आहे. मात्र आजही त्यांची सोडवणूक होताना दिसून येत नाही. प्रसारमाध्यमांकडूनही याची दखल घेतली जात नाही. अनेकदा सर्व संघटनांचे प्रतिनिधी हे त्यांच्यापर्यंत आपल्या व्यथा मोठ्या अपेक्षेने घेऊन जातात. पण त्यांना त्यांच्या प्रसारमाध्यमांमध्ये अपेक्षित स्थान मिळत नाही. ते प्रश्न तसेच दुर्लक्षित राहिले जातात. अनेक कर्मचाऱ्यांची याबाबतची व्यथा होती. त्यामुळे आता त्यांना त्यांच्या हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठीच त्यांचेच वृत्तपत्र सुरु करण्याचा निर्णय आम्ही घेतला. चाकोरीबाहेर जावून काम करण्यासारखा हा प्रकार होता. कारण कर्मचारी सकाळ ते संध्याकाळपर्यंत जनतेच्या सेवेत गुंतलेला असतो. हा कर्मचारी शहरी व ग्रामीण भागात मोठ्या संख्येने विखुरलेला आहे. वेगवेगळ्या विभागात तो कार्यरत आहे. त्यांच्या अनेक प्रश्नांची सोडवणूक अद्यापही झालेली नाही. तसेच त्यांच्याबद्दल जनतेच्या मनातदेखील काही वेळा गैरसमज निर्माण होत असतात. त्यांची प्रतिमा काहीशी बदलण्यासारखी परिस्थिती काही घटनांमुळे होत असते, हे खरे. अशा-वेळी शासकीय कर्मचारी वर्गाला जनतेच्या मनात आदराचे स्थान ठेवण्यासाठी कार्य करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येणार आहे तसेच प्रशासनाचा कारभार अधिक गतीने सुस्थित राहण्याचेही दायित्व राखण्यासाठी कर्मचाऱ्यांना सदैव प्रोत्साहन मिळाले पाहिजे. याबाबतीत विचार करून आम्ही आमची भूमिका याबाबतीत ठरवत आहोत. त्यानुसार याबाबतचे वृत्त व घडामोडी यांची माहिती प्रसिद्ध करून संवाद साधला जाईल. त्याचबरोबर त्यांच्या विभागातील घडामोडी, वार्ता तसेच महत्वाची माहिती प्राप्त करुन ती प्रत्येक माहिती जनतेपर्यंत कशी पोहचली जाईल, याबाबत सर्वसामान्य स्तरातील जनतेचाही यात सहभाग अवश्य घेण्यात येणार आहे. त्यांनादेखील शासकीय स्तरावर तसेच कर्मचारी वर्गापर्यंत त्यांच्या भावना पोहचविण्याचे एक माध्यम म्हणून त्यांच्यासाठी सदैव उपलब्ध राहण्याचा महत्वाचा पर्याय म्हणून आम्ही खुला केला आहे. शासकीय कर्मचारी वर्गाची माहिती ही महाराष्ट्रात सर्वसामान्यांपर्यंत देखील पोहचली जावी, म्हणून या उपक्रमाची व्याप्ती सर्वदूर नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या सर्व वर्गातील कर्मचाऱ्यांनी समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी सुरु केलेले हे नियतकालिक महाराष्ट्रात किंबहुना देशात प्रथमच असावे. या प्रयोगाची व्याप्ती अधिकाधिक व्यापक करण्याचा देखील प्रयत्न यानिमित्ताने करण्यात येणार आहे. या नियतकालिकात सर्व कर्मचाऱ्यांनी आपला सहभाग दिला पाहिजे. ही केवळ आपल्या विभागात किंवा विभागापुरचीच माहिती नव्हे तर अधिक सुधारणा अथवा त्या अनुषंगाने बदल करण्यासाठी सूचनादेखील दिल्या पाहिजेत. शासकीय स्तरावरून या उपक्रमाची अधिकाधिक सकारात्मकतेने दखल घेतली जाईल, याचा प्रयत्न राहिल. कर्मचारी वर्गाबाबत शासनाचे धोरण, निर्णय तसेच काहीबाबतीत बदल अथवा सुधारणांसाठी जाणिव करून देण्यासाठी लिखाण करण्याचाच प्रयत्न राहणार आहे. सरकारचा कारभार हा जनतेचा असून तो महाराष्ट्रातील लोकांसाठी कसा उपयुक्त राहिल, हा त्यामागचा हेतू आहे. सरकार म्हणजेच प्रशासन आणि कर्मचारी ही एकसंघ शक्ती असून त्यांना अधिक प्रभावी आणि बळकट करण्याच्या हेतूने **'कर्मचारी टाइम्स'** कार्यरत राहणार आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या वर्गाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी नेतृत्वाची फार मोठी परंपरा आहे. यात र. ग. कर्णिक यांचे स्थानी अग्रणी आहे. त्यांच्यानंतर अनके कर्मचारी नेतृत्वाची फळी उभी राहिली. या संकल्पनेचे स्वागत आजच्या घडीला अधिक प्रभावीपणे कार्यरत संघटना पदाधिकाऱ्यांनीही केले आणि त्याला प्रतिसाद देत सहभाग दिला त्याबद्दलही धन्यवाद व्यक्त करतो.

◆◆◆

पान १ वरुन ...

तसेच महागाईसकट अन्य भत्ते मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. इतकेच नव्हे, तर केंद्राने निर्णय घेतल्यानंतर त्याच तारखे-पासून त्या निर्णयाचा लाभ राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना मिळू लागला. कर्णिकांचे मोठे बंधू प्रजासमाजवादी पक्षात होते. मूळचे नाशिकचे असलेले कर्णिक हे नंतर अस्सल मुंबईकर बनले. साने गुरुजी यांच्या प्रभावामुळे सुरुवातीच्या काळात ते राष्ट्र सेवा दलाशी संबंधित होते.

गोदी कामगारांचे ज्येष्ठ नेते मनोहर कोतवाल हे त्यांचे मामा. प्रसिद्ध कामगारनेते शांती पटेल यांच्याशी देखील त्यांचे नाते आहे. कामगार चळवळीत काम करण्याचे बाळकडू त्यांना कोतवाल यांच्याकडूनच मिळाले. महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात ते सुरूवातीला सहायक पदावर रूजू झाले आणि पुढे ते अवर सचिव ह्या महत्वाच्या पदापर्यंत पोहोचले. हैदराबादला कामगार चळवळीतील एका मोठ्या परिषदेला हजर राहिल्यानंतर ते त्या कामात ओढले गेले. त्यातून ६ नोव्हेंबर १९६२ रोजी वांद्रे येथील परिषदेत राज्य सरकारी मध्यवर्ती कामगार संघटनेची स्थापना झाली.

दिनकरराव कलावडे हे अध्यक्ष व र. ग. कर्णिक सरचिटणीस झाले. ही संघटना चालविताना कोणत्याही राजकीय पक्षाचा शिक्का बसणार नाही, याची काळजी कर्णिकांनी कायमच घेतली. परिणामी पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या-पासून पृथ्वीराज चव्हाण यांच्यापर्यंत विविध स्वभावाच्या सर्वच मुख्यमंत्र्यांकडून मागण्या मान्य करून घेण्यात ते यशस्वी ठरत गेले.

ज. बा. कुलकर्णी, ग. दि. कुलथे, भाई आचरेकर अशा

# भीष्माचार्य र. ग. कर्णिक

सहकाऱ्यांच्या माध्यमातून त्यांनी संघटना महाराष्ट्रभर नेली. ११ ऑगस्ट १९६६ रोजी एक दिवसाचा पहिला संप यशस्वी केला. त्यानंतर १९७० ला ११ दिवस, १९७४/७५ ला ३७ दिवस आणि १९७७/७८ ला झालेला ५४ दिवसांचा महत्वाचा संप करण्याचा निर्णय त्यांना घ्यावा लागला. मात्र, हे टोकाचे हत्यार त्यांनी नंतर वारंवार उपसले नाही.

महाराष्ट्र राज्य शासकीय सेवेत आल्यानंतर कर्मचाऱ्यांना तडकाफडकी बडतर्फ करणे तसेच अन्य अन्यायकारक गोष्टी त्यांच्या ध्यानात आल्या. त्यामुळे त्यांनी संघटनेची मुहूर्तमेढ रोवण्यास सुरूवात केली. १९५८ मध्ये सेक्रेटरिएट अँड अलाईड ऑफिसेस स्टाफ असोसिएशनची स्थापना केली. १९६० साली अखिल भारतीय स्थापनेत भाग घेतला. त्याच धर्तीवर ६ नोव्हेंबर १९६२ ला महाराष्ट्रातील राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांची संघटना बांधत त्यांनी महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट एम्प्लॉईज कॉन्फेडरेशनची स्थापना केली. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मान्यता देत मंत्रालयात कार्यालय देखील देऊ केले.

त्या वेळच्या काळात केवळ मंत्रालयीन कर्मचारी वर्गापुरती मर्यादित असलेल्या कर्मचारी संघटनेचा राज्यस्तरीय विस्तार करण्याचे संपूर्ण श्रेय कर्णिक यांना जाते. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे नेतृत्व करताना, कर्णिक यांनी संपासारख्या अस्त्राचाही योग्य वापर केला. केंद्राप्रमाणे महागाई भत्ता आणि वेतन आयोगाचे लाभ मिळावे, यासाठी १९७७ मध्ये सरकारी कर्मचाऱ्यांचा ५६ दिवसांचा संप केला. त्या वेळी लगेच काही कर्मचाऱ्यांच्या पदरात पडले नाही; परंतु त्यांचे प्रत्यक्ष तसेच अप्रत्यपणे राजकीय परिणाम झाले. राज्यात सत्तांतर झाले आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार आले. त्या सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्या आणि राज्य कर्मचाऱ्यांना केंद्राप्रमाणे महागाई भत्ता आणि पुढे १९८६ पासून केंद्राचा वेतन आयोगही लागू करण्याचे धोरण अमलात आले.

या कामगार चळवळीला

**भाऊसाहेब पठाण**

सामाजिक कार्याची जोड देत भगीरथ संस्थेच्या माध्यमातून नाशिक व नागपूर आदी परिसरात क्षेत्रविकास, आरोग्य शिबीरे, स्वयंरोजगार, क्रीडा आदी उपक्रम राबविले. नागरी सेवा प्रबोधिनीची स्थापना करत कर्मचाऱ्यांना कार्यपद्धती, एड्स विषयक जागरूकता, आरोग्य शिबीरे आदी अनेक उपक्रम राबविले. १९९० मध्ये कोईमतूर येथील अधिवेशनात त्यांची अखिल भारतीय राज्य शासकीय कर्मचारी महासंघ अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.

त्यांनी आपल्या एकंदरीत काळात राजकीय पक्षाचा झेंडा खांद्यावर न घेण्याची, जात - धर्म न पाळण्याची तसेच रास्त मागण्याची सनद जोरकस आग्रहासह मांडण्याची त्रिसूत्री अवलंबिली. त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले तसेच अनेक संस्थांवर विश्वस्त म्हणूनही त्यांनी कार्य केले. यात शिर्डी येथील साई संस्थानचाही समावेश आहे.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे नेतृत्व र.ग. कर्णिक साहेबांनी जवळपास अर्धशतक म्हणजे ५० वर्षे केले.

अखिल भारतीय स्तरावरही कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर त्यांनी लढे दिले. १९९१ नंतर जागतिकी करणाने आणलेले जागतिकीकरण-खासगीकरण उदारीकरणाच्या विरोधातील लढ्यातही ते अग्रभागी होते. सरकारी कर्मचाऱ्यांबरोबरच निमशासकीय व खासगी क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांवरील आंदोलनाचे नेतृत्व त्यांनी केले.

मैदानात आव्हानाची भाषा नेतृत्वाला करावीच लागते, मात्र प्रश्न सुटण्यासाठी संयम आणि समन्वयाची भूमिकाही हवी असते, कर्णिक यांना त्याचे भान होते, त्यामुळेच त्यांचा शेवटपर्यंत एक आदरयुक्त दरारा राहिला.

सरकारी कर्मचाऱ्यांचे श्रद्धास्थान असलेले र. ग. कर्णिक यांची जयंती २७ जानेवारी या दिवशी असून शासकीय स्तरावर ती साजरी करण्यात यावी तसेच त्यांच्या नावे शासकीय कर्मचाऱ्यांस पुरस्कार देण्याचा उपक्रम दरवर्षी राबविण्यात यावा, या मागणींची पूर्तता झाली तरच खऱ्या अर्थाने र. ग. कर्णिक साहेबांना आदरांजली ठरणार आहे.

कर्णिक साहेबांनी कामगार चळवळीच्या नेत्यांनाही घालून दिलेला आदर्श हा एक वारसा असून तो आता सध्याच्या पिढीबरोबरच येणाऱ्या नव्या पिढीलाही मार्गदर्शन करणारा आहे तसेच अनुकरणीय आहे. त्यांच्या विचारांनुसार कामगार नेत्यांनीही कर्मचाऱ्यांच्या हितासाठी कार्य करण्याची गरज आहे. कर्णिक साहेब आज आपल्यात नसले तरी त्यांचे विचार असून त्यांच्या विचारा-नुसार कृती करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपणा सर्वांना एकत्र बांधणारा दुवा म्हणजेच साहेब होय. त्यांना विनम्र अभिवादन.

◆◆◆

# वाचकपत्र

## हेही लिखाण व्हावे...

**'कर्मचारी टाइम्स'** हे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांविषयी माहिती देणारे वृत्तपत्र सुरु झाले. त्याबद्दल सर्वात प्रथम अभिनंदन तसेच शुभेच्छा. या वृत्तपत्रामुळे कर्मचारी वर्गाची कामगिरी तसेच त्यांच्याबद्दलचे प्रशंसनीय वृत्त प्रकाशित होईल, हे नक्कीच. पण एक वाचक म्हणून माझी अपेक्षा अशीही आहे की, केवळ गोडधोड बातम्या देण्याबरोबरच काही बाबतीत कर्मचारी वर्गाच्या डोळ्यात अंजन घालणारे तसेच त्यांच्या चुका ध्यानात आणून त्यांची कामगिरी अधिक चांगल्या प्रकारे सुधारता येईल, हे कर्मचारी अधिक जबाबदारीने आपली कामे करतील आणि जनतेच्या अपेक्षांची पूर्ती करतील, त्यांच्या दायित्वाबद्दल सजग राहतील, याबाबत देखील या वृत्तपत्रातून लेखन हवे. बाळशास्त्री जांभेकर, लोकमान्य टिळक, आगरकर यांच्यासारख्या पत्रकारांची परंपरा वृत्तपत्रकारितेला आहे. त्यांचा वारसा जपण्यासाठी निर्भीडपणे तसेच परखडपणे लिखाण या वृत्तपत्रातून व्हावे, हीच अपेक्षा.

**- विश्वास रणदिवे**
(सार्वजनिक बांधकाम विभाग)

## जुनी पेन्शन योजना

महाराष्ट्र राज्य हे देशातील अत्यंत प्रगतशील राज्य आहे तसेच जनहिताचे निर्णय घेण्याबाबत शासनाचा लौकिक आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नेहमीच त्यांनी सकारात्मक विचार करून निर्णय घेतला आहे.

पण ज्या गोष्टीबाबत राज्यातील कर्मचारी वर्ग नव्याने सत्तेवर आलेल्या सरकारकडे अपेक्षने बघत आहे, त्याची पूर्तता मात्र अद्याप झालेली नाही. ती म्हणजे जुनी पेन्शन योजना. हिमाचल प्रदेश, राजस्थान, पंजाब, छतीसगड राज्याने तत्काळ निर्णय घेतला आणि त्यांच्या सेवेतील शासकीय कर्मचाऱ्यांना ही योजना तत्काळ लागू केली. आता महाराष्ट्रात देखील राज्य सरकारने कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत सकारात्मक राहिले पाहिजे व त्याच्याबरोबच ही सकारात्मक तत्काळ वृत्तीतदेखील उतरवली पाहिजे. गेली अनेक वर्षे या प्रश्नावर कर्मचारी संघटना वेगवेगळ्या माध्यमातून लढा देत आहेत. अनेक आंदोलनेदेखील झाली आहे. कर्मचारी वर्गाची ही मागणी मान्य व्हावी, यासाठी सरकारने संवेदनशील राहिले पाहिजे. काही मुद्दे असतील तर त्याबाबत संघटनांसमवेत चर्चा केली पाहिजे. इच्छाशक्ती असेल तर प्रत्येक काम सोपे होते अथवा शक्य होते. लाखो कर्मचारी सध्या शासकीय सेवेच्या माध्यमातून जनहिताचे काम करत आहे. त्यांना यानिमित्ताने फार मोठा दिलासा मिळेल तसेच निवृत्तीनंतर त्यांचा भविष्यकाळ सुखावह ठरेल. याबाबत सरकारने तत्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. जुनी पेन्शन योजना ही अत्यंत संवेदनशील आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणून सरकारने विचारात घेण्याचा गरज आहे.

**स्वाती वर्मा,**
(उद्योग विभाग)

**आवाहन**
वाचकांनी आपली मते वाचक पत्रासाठी ईमेल अथवा व्हॉट्सएपवर पाठवावीत.
karmacharitimes@gmail.com
९८९०९६५८८, ९८२१३७४६२६

# इतिहासाची पाने उलटताना...

पान १ वरुन ...

१९६२ साली राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेची (तृतीयश्रेणी) स्थापना झाली. अहमदनगर चे आण्णासाहेब कलावेड, अध्यक्ष व मुंबईचे श्री. र.ग.कर्णिक सरचिटणीस झाले. त्यांनी महाराष्ट्रतील तृतीयश्रेणी कर्मचाऱ्यांच्या मनातला भयगंड दूर केला.

मोठ्या कौशल्याने तसेच संयमाने तथा आवश्यक तिथे आक्रमक होत या संघटनेची पालेमुळे सर्व जिल्हा तालुका तथा ग्रामीण भागात रुजवली. च.श्रे.कर्मचाऱ्यांच्या तत्कालीन नेत्यांबरोबर त्यांचे संबंध सलोख्याचे व सौहार्दाचे होत. मात्र दोन्ही संघटनांचे विचार तसेच अस्तित्व स्वतंत्र होते. १९७० मध्ये राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना व च.श्रे.कर्मचारी संघटना आणि जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ एकत्रित येऊन त्यांनी महागाई भत्ता केंद्राप्रमाणे मिळवा. या मागणीसाठी संप पुकारला. च.श्रे.कर्मचारी लघूवेतन संघाचे अध्यक्ष आणि जि. प. कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष (तृ.श्रे.) यांनी सरकारशी हातामिळवणी करीत संप फोडण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट च.श्रे.कर्मचारी संघटनेचे लढव्यये नेते आण्णासाहेब रोकडे, शिवराम मोहीते कृ. ना. (भाई) परब, गं.बा.भोसले, ना.स.राणे यांच्यासह अनेकांना आवडला नाही. त्यांनी या संपाला पाठींबा जाहीर करून हा संप यशस्वी करण्यासाठी मोलाची मदत केली. च.श्रे. कर्मचाऱ्यांच्या शक्तीची तृतीयश्रेणी संघटनेच्या सर्व मान्यवरांना नोंद घ्यावी लागली. त्यांनी आंदोलनातील सरदार म्हणून कर्मचाऱ्यांची पाठ थोपटली. इथेच च.श्रे.संघटनेत फूट पडली आणि राज्य सरकारी च.श्रे.कर्मचारी मध्यवर्ती संघटनेची स्थापना १९७० मध्ये नव्याने झाली.

दीर्घ संपामध्ये १९७० साली ११ दिवसांच्या संप नेटाने व मोठ्या धैर्याने लढविल्यामुळे कर्णिकांना चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या शक्तीची जाणीव होऊन त्यांनी ही एक संघ शक्ती आपल्या सोबत रहावी म्हणून श्री. अरविंद चिटणीस यांनी केलेल्या सहकार्यामुळे नेत्यांबरोबर चर्चा करून राज्य सरकारी कर्मचारी संघटना (कान्फडरेशन) चा एक घटक या संघटनेला म्हणून सन्मान दिला.

त्यानंतर १९७५ मध्ये ३७ दिवस झालेला संप, १९७६ साली त्यांनी इतिहास घडविला. ५४ दिवसाचा प्रदिर्घ संपासह अन्य सर्व लढा आंदोलनात आपला लढावू बाणा टिकवून चतुर्थश्रेणी कर्मचारी या लढयात अग्रेसरचं राहीला म्हणूनचं ही सर्व केलेली आंदोलने यशस्वी होऊ शकली. हे नाकारून चालणार नाही. मध्यवर्ती संघटनेचे सर्व लढे हे महागाईभत्ता, वेतनसुधारणा या आर्थिक प्रश्नांवर सुरू होते. त्यामुळे चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे अनेक स्वतंत्र



प्रश्न जे त्यांच्या जीवनाशी निगडीत होते. सेवानिवृत्ती नंतर कर्मचाऱ्यांच्या एका पाल्यास सेवेत सामावून घ्यावे. सेवेत मृत झालेले अथवा वैद्यकीय कारणास्तव काम करण्यास असमर्थ ठरत असल्यास अनुकंपातत्वावर कुटूंबातील एका व्यक्तीस सेवा मिळावी. गणवेश, शिलाई व धुलाई भत्ता, अतिकालीक भत्ता, बोनस, पदोन्नतीच्या संधी मिळाव्यात या सारख्या अन्य प्रश्नावर राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती संघटना आग्रही राहून त्यासाठी त्यांनी स्वंतत्रपणे आंदोलने करून काही मागण्या मिळविण्यात यशस्वी झाली आहे.

१९८७ साली मुंबईत चतुर्थश्रेणी संघटनेच्या वतीने मागणी परिषदेचे आयोजन करून मंत्रालयावर मोर्चा काढण्यात आला याची फलश्रुती म्हणून शिपाई संवर्गाच्या अतिकालीक भत्त्यामध्ये वाढ करण्यात व १९९० साली टेरिकोट या प्रकारचा गणवेश मिळविण्यात यश प्राप्त झाले. या संघटनेचे नेतृत्व करण्याची संधी मला मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. या दरम्यानच्या कालावधीत चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गाची अनेक आंदोलन झाली. आपल्या प्रश्नांकडे राज्य शासनाकडे लक्ष वेधण्यासाठी १ मे २००५ हा राज्याचा ४५ वा वर्धापन दिनी आझाद मैदान मुंबई येथे निषेध दिन पाळण्यात आला.

आंदोलनासाठी मुंबईसह राज्यभरातून १६७३ कर्मचारी प्रतिनिधी उपस्थित होते. या आंदोलनास पाठींबा देण्यास तृतीयश्रेणी व राजपत्रित अधिकारी संघटना या संघटनेचे सरचिटणीस प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

किमान चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना तरी बोनस द्या ही मागणी घेऊन १६ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर २००६ रोजी सलग तीन दिवस आक्रोश आंदोलन हे माझ्या नेतृत्वा खाली घेण्यात आले होते.

या आंदोलनाला प्रतिदिन कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहून मंत्रालयाच्या आरसागेट समोर निदर्शन करू लागला. तिसऱ्या दिवशी पोलिसांनी या आंदोलनाला प्रतिदिन कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहून मंत्रालयाच्या प्रगणातचं आपला आक्रोश सुरु केला. यावेळी या आंदोलनात प्रतिदिन कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहून मंत्रालयाच्या प्रगणातचं आपला आक्रोश सुरु केला. यावेळी या आंदोलनास पाठींबा देण्यास राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे कार्याध्यक्ष ग. शं. शेटे व राजपात्रित अधिकारी महासंघाचे सरचिटणीस ग. दि. कुलथे उपस्थित होते. मात्र याचवेळी पोलिसांनी माझ्यासह ११० कार्यकर्त्यांना अटक करून आझाद मैदान येथे नेले यामध्ये शेटे यांना सुध्दा अटक झाली होती. अटक झाल्याबरोबर कुलथे यांनी सुनिल जोशींना माहिती दिली. मिलींद सरदेशमुख, रामदास पडवळ, गुलाब पवार या कार्यकर्त्यांच्या मदतीने तात्काळ मंत्रालयाच्या प्रांगणात उतरविले जो पर्यंत अटक झालेल्याची सुटका होत नाही. तो पर्यंत अटक झालेल्याची सुटका होत नाही. तोपर्यंत मंत्रालयात ठिय्या आंदोलन देऊन बसलो. त्यामुळे सरकारला ताबडतोब आमची सुटका कोणतीही कारवाई न करता करावी लागली. या आंदोलनाने एक नवा इतिहास घडविला. नजिकच्या काळात बोनससह अनेक प्रश्नांवर लढावू आंदोलन उभे करणे गरजेचे आहे. जिल्हा परिषदेतील व सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची एकजूट एकसंघ होण्याची गरज आहे.

नजीकच्या काळात अनेक प्रश्नांवर लढे उभारण्याची गरज निर्माण होणार आहे. त्यासाठी आंदोलनेदेखील उभी करणे गरजेचे आहे.

प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी ती सहजासहजी होत नाही, असा आतापर्यंतचा अनुभव आहे. त्यासाठी प्रत्येक पातळ्यांवर आपल्याला सज्ज रहावे लागते. त्यानुसार लढा द्यावा लागता. यात प्रत्येक कर्मचारी वर्ग सहभागी असावा लागतो. तरच लढा यशस्वी होत असतो.

शासकीय कर्मचाऱ्यांची व्याप्ती ही महाराष्ट्र राज्यभर आहे. त्यामुळे तालुका तसेच जिल्हा स्तारावर देखील एकत्रित होऊन आपल्या न्याय्य हक्कासाठी लढा देण्याची सज्जता कायम ठेवली पाहिजे. कामगार नेते तसेच कर्मचारी यांची ताकद ही त्यांच्यासाठी दिसत असली तरी त्याचा प्रत्यक्ष संबंध हा जनतेच्या कल्याणासाठीच असते, हेही जनतेने तसेच राज्यकर्त्यांनीही विचारात घेतले पाहिजे.

◆◆◆

# कामगार नेते, पत्रकार नारायण मेघाजी लोखंडे

जेव्हा राज्यातील प्रमुख उद्योग बंद पडतो, तेव्हा हजारो कामगारांचे संसार उध्वस्त होतात. त्यासाठी एका पिढीला



आपले आयुष्य खर्ची घालावे लागते. पण ज्यांचे जीवन उध्वस्त होते, त्यांची आयुष्ये थांबत नसतात. त्या वेदना फक्त त्यांना माहित असतात. मुंबईमधील प्रमुख उद्योग होता तो म्हणजे गिरणी उद्योगाचा. त्याच्या अस्ताला सुरूवात झाली तो दिवस होता १८ जानेवारी १९८२. आजही तो

**नासिकेत कृष्णकांत पानसरे**
(डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त )

गिरणी कामगार न्यायासाठी मुंबई शहरात लढत आहे. तो गिरणी कामगार न्यायासाठी मुंबई शहरात लढत आहे. काही कामगार संघटनांचे नेते, राजकीय नेते, मालक यांच्या संगनमताने समस्त कामगार देशोधडीला लागला गेला. याच गिरणी कामगारांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आंदोलने केली. त्याच गिरणींच्या जागेवर मॉल संस्कृती, उच्चभ्रूंसाठी वसाहती व उद्योजकांची कार्यालये उभी राहिली.

याच गिरणी कामगारांच्या वर्गाच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांनी देशातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. त्यांनी आठवड्याची सुट्टी प्रथम मिळवून दिली. म्हणूनच त्यांना भारतीय चळवळीचे जनक म्हटले जाते.

नारायण मेघाजी लोखंडे यांचा जन्म १८४८ मध्ये ठाणे शहरात झाला. त्यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील राजगुरूनगर व तालुका खेडजवळील कन्हेरसर होय. ते एका शेतकरी कुटुंबात जन्मले. साधन म्हणून त्यांनी प्रथम रेल्वे खात्यात, त्यानंतर टपाल खाते या ठिकाणी कारकूनाची नोकरी केली. त्याचवेळी गिरणी कामगारांची व्यथा त्यांनी जवळून पाहिली. ते विदारक दृश्य पाहताना कामगारांचे हाल त्यांना पाहवेनात. त्याचवेळी त्यांनी निश्चय केला. गिरणी कामगारांना न्याय मिळवून देण्याचा आणि त्यासाठी ते सज्ज झाले.

प्रथम ते महात्मा जोतिराव फुले यांच्या सहकाऱ्यांपैकी एक होते. महात्मा जोतिराव फुले यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडण्याचे काम सुरु केले होते. ब्रिटीश सरकारला शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे सांगत होते. नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगार हिताचे आंदोलन त्याच दरम्यान सुरु केले.

१८९३ साली पुन्हा मुंबईत जातीय दंगल झाली. एकही कामगार नेता रस्त्यावर उतरला नव्हता तसेच दंगल विझवण्यापेक्षा भडकवली गेली. त्यावेळी दंगल विझवणाऱ्याचा काम लोखंडे यांनी केले. म्हणून त्यांना रावसाहेब ही पदवी सरकारने बहाल केली. फेब्रुवारी १८९७ रोजी भारतीय कामगार चळवळीचे एक क्रांतिकारी पर्व समाप्त झाले.

आज जागतिकीकरण, खासगीकरण, उदारीकरण, कंत्राटीकरण यांच्या नावाखाली कामगार व कामगार चळवळ दडपली जात आहे. हे आजचे सत्य चित्र डोळ्यासमोर दिसत आहे. कामगार नेते नारायण मेघाजी लोखंडे या ध्येयवादी, निःस्वार्थी, कणखर नेतृत्वाची आजच्या काळात सुद्धा गरज आहे.

त्यांच्या कार्याची स्मृती जागृत रहावी, यासाठी नारायण मेघाजी लोखंडे स्मृती विचार मंचाचे अध्यक्ष व गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त सुदाम किसन गाडेकर यांनी महाराष्ट्र शासनाने लोखंडे यांची १३ ऑगस्ट या दिवशी जयंती दरवर्षी शासकीय पातळीवर साजरी करावी, अशी मागणी सरकारकडे केली आहे. आजपर्यंत १५० वर्षे झाली तरी या महान व्यक्तीचे मुंबई शहरात स्मारक, पुतळा असे स्मरणीय काही झाले नाही, याकडे त्यांनी लक्ष्य वेधले आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातील हुतात्मा बाबू गेनू गिरणी कामगार भवनाच्या आवारात रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांचा पुतळा बसवण्यात यावा, अशी अनेक वर्षांची गाडेकर यांची मागणी आहे. यासाठी त्यांनी सरकार दरबारी पत्रव्यवहार केला आहे. त्यांच्या या मागण्या मान्य होवोत.

नारायण मेघाजी लोखंडे यांच्या कार्याचा शासनाकडून यथोचित सन्मान होईल, अशी सदिच्छा या निमित्ताने व्यक्त करतो. ◆◆◆


# प्रसारमाध्यमांतील कर्मचाऱ्यांचे भवितव्य...

पत्रकारिता हे लोकशिक्षण व समाजशिक्षणाचे एक माध्यम आहे. पूर्वीही ते होते. आज ही आहे आणि उद्याही राहणार आहे, समाजाला लोकशिक्षण, समाजशिक्षण म्हणजे काय याच्या आकलनात काळानुरूप बदल होत गेल्याने पत्रकारितेची रूपे बदलत गेली आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश शासन हे परक्यांचे शासन आहे, त्या शासनाला उलथविले पाहिजे. समाजातील कुप्रथा संपुष्टात आल्या पाहिजेत यासाठी सर्व राजकारण्यांनी पत्रकारितेचा आधार घेतलेला आपल्याला दिसून येतो. मराठी भाषेचा विचार केला तर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केसरी व इंग्रजीत मराठा काढला. गोपाळराव आगरकर यांनीही समाजसुधारणेसाठी पत्रकारितेची कास धरली. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर भारतीय राजकारणात आलेले महात्मा गांधी यांनीही स्वदेश व हरिजन ही वृत्तपत्रे काढली. राजकारणाचा वेगळ्या शैलीत वसा चालविणारे स्वातंत्र्यवीर बॅ. विनायक दामोदर सावरकर यांच्यातर प्रत्येक जीवनपैलूचे अधिष्ठान राष्ट्रभक्ती, प्रखर राष्ट्रभक्ती हेच होते. त्यांनीही पत्रकारिता केली. दलित उत्थान व राष्ट्रभक्तीचा वसा घेतलेले डॉ. आंबेडकर यांनीही चळवळीसाठी म्हणून बुध्दभूषण प्रेसची स्थापना केली व बहिष्कृत भारतचे संपादन, प्रकाशन सुरू केले.

१९४७ साली स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ब्रिटिश शासन उलथवून लावणे हा हेतू लोप पावला आणि पत्रकारितेसमोरचे ध्येय संपुष्टात आले. ध्येयवादी पत्रकारितेचा एक महत्वाचा अध्याय त्या ठिकाणी संपला. स्वातंत्र्याचे सुराज्यात रूपांतर व्हावे ही ध्येयकारिता राहिली नाही. सुराज्याच्या प्रत्येकाच्या संकल्पना भिन्न होत्या. जो तो राजकीय नेता आपल्या संकल्पनेप्रमाणे सुराज्य



आणण्याचे माध्यम म्हणून पत्रकारितेकडे बघू लागला. भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वृत्तपत्रावरील निर्बंधही खूपशा प्रमाणात शिथिल झालेत. त्यामुळे पत्रकारितेला चांगले दिवस आलेत. हिंदुत्वाचा प्रभावी जागर करणारे म्हणून सोबत निघाले. ग.वा. बेहरे हे सोबतचे संपादक होते, तर



मराठी भाषकांसाठी म्हणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मार्मिक साप्ताहिक काढले. पुढे सामना हे दैनिक काढले. काळानुरूप परिवर्तन करीत गेलेली वृत्तपत्रे, मासिक, साप्ताहिक टिकवीत तर अनेक काळाच्या उदरातही गडप झालीत. मुंबईतील लोकमान्य हे दैनिक तर नागपूरचे महाराष्ट्र दैनिक, पुढे सोबत ही वृत्तपत्रे काळाच्या उदरात गडप झालेली दिसतात.

स्वातंत्र्यप्राप्ती ते आणीबाणी हा पत्रकारितेचा वेगळा टप्पा होता. ध्येयवादी पत्रकारिता काहीशी एकाकी पडत गेली आणि व्यावसायिक निष्ठा असलेली वृत्तपत्रे वाढत गेलीत. त्यातही काळानुरूप परिवर्तने. आधुनिक यंत्रसामुग्री व नवनवीन तंत्रे यांचा वापर महत्वाचा ठरला.

मागील काही वर्षात सोशल मीडिया हा जास्त प्रभावी ठरला आहे. वृत्तपत्र वा चॅनेल्सऐवजी फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सअॅप, इंस्टाग्राम या माध्यमातून व्यक्त होणे सुरू झाले आहे. त्याउलट फार तातडीने मजकुराची देवाणघेवाण होते. ट्विट केल्यावर लागलीच जगातील कुठल्याही भागात ते पोहोचलेले असते. आता वेळ अशी आलेली आहे की, छापून वृत्तपत्र वाचकाकडे घालविणे ही संकल्पनाही निवृत्ती मार्गाला लागली आहे. आपल्या हातातील मोबाइलवर सर्व बातम्या, सर्व अंक बघायला मिळू लागले आहेत. एवढी विलक्षण गतिमानता वाढली आहे, हे परिवर्तन, त्याचा प्रचंड वेग हा डोके गरगरायला लावणारा झाला आहे.

सर्व परिस्थितीचा बदल आपण स्वीकारत आहोत. असे होत असताना कर्मचारी वर्गाला मात्र त्याची झळ मोठ्या प्रमाणावर बसत आहे. याचे कारणमहणजे वृत्तपत्रांमध्ये

**अण्णासाहेब देसाई**, अध्यक्ष
भारतीय पत्रकार संघ

कायमस्वरुपी नोकरीला कर्मचारी मुक्त आहे. बच्छावत आयोगानंतर कर्मचारी वर्गाला वेतन इतरांप्रमाणे सुस्थित मिळत होते. पण त्याचा परिणाम असा झाला की, मालकांनी कर्मचाऱ्यांना पगार जास्त देण्याची पळवाट काढली. त्यामुळे बच्छावत आयोगाप्रमाणे पगार घेणारी पत्रकारांची ती पिढी वेतनाच्या बाबतीत अखेरची ठरली. कारण त्यानंतरच्या काळात मात्र कंत्राटावर पत्रकार अथवा वृत्तपत्रातील कर्मचारी वर्ग नियुक्त करण्याची प्रथा पडली. त्यामुळे दरवर्षी किंवा ३ वर्षांनी पत्रकार किंवा कर्मचारी यांचे नूतनीकरण करण्याचा मार्ग अवलंबिला गेला. यात त्या कर्मचाऱ्यांला कुठलीही शाश्वती नव्हती. त्यामुळे आज काम आहे पण उद्या नाही, अशी परिस्थिती सध्या तरी प्रसारमाध्यमांमध्ये दिसून येत आहे. यात कुठल्याही प्रकारचे संरक्षण नाही. त्यामुळे या कर्मचारी वर्गावर सतत टांगती तलवार आहे हे नक्कीच. त्यातूनच मग त्या वार्तांकन करणाऱ्या कर्मचारी वर्गाला आता मार्केटिंग करण्याच्या कामाला अनेकांनी जुंपले आहे. केवळ बातम्या नव्हे तर त्यातून वितरण वाढवणे तसेच जाहिराती आणणे हेदेखील बंधनकारक झाले आहे. त्यामुळे आपल्या बातम्यांचे पेपर्स समोरच्या मंडळींनी विकत घ्यावे तसेच जाहिराती द्याव्यात, अशी परिस्थिती अनेक नामांकित पत्रकारांपुढे असून त्याचाही त्यांनी स्वीकार केलेला आहे. हे पत्रकारितेच्या पेशाचे बदललेले स्वरुप आहे. पण त्याला कुणाचाही विरोध नाही, याचे कारण म्हणजे नोकरी गमावली जाण्याची भीती. त्यातूनच मग अनेकांनी आपल्या तत्वाच्या बाबतीत तडजोड केलेली दिसून येते.

समाजाला न्याय देण्याच्या भूमिकेत असलेले पत्रकार हे मात्र स्वतःच्या हक्कासाठी मात्र तितकेसे जागरूक नसतात किंवा त्यांची हक्क मिळवून घेण्याची काही बाबतीत हतबलता असू शकते, हे विदारक चित्र बदलण्यासाठी फार दीर्घकाळ लढा द्यावा लागणार आहे. सध्याची पिढी तरी मूग गिळून गप्प बसेल पण पुढच्या पिढीने मात्र आक्रमक राहून त्यांची व्यूहनीती आखली पाहिजे. दीर्घकालीन लढा देण्यासाठी तसेच उपाययोजना करण्यासाठी सज्ज राहिले पाहिजे. ◆◆◆

# वीज कर्मचाऱ्यांनो जागे व्हा!

वीज कर्मचाऱ्यांचा संप एकच दिवसात संपला म्हणून सर्वांनीच सुटकेचा निश्वास सोडला. याबद्दल उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार. त्यांनी कामगार संघटनांचे म्हणणे सहानुभूतीने ऐकून घेतले आणि तोडगाही काढला.

महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण अशा तीनही कंपन्यांतील एकूण ३२ कर्मचारी संघटनांनी हा संप पुकारला होता. त्यांनी वास्तववादी भूमिका घेतली आणि संप मागे घेण्याचा निर्णय घेतला. मी त्यांचाही आभारी आहे.

संघटनांचे आभार मानताना एक गोष्ट स्पष्ट सांगितली पाहिजे. हा संपाचा निर्णय गैरसमजावर आधारित होता. त्यानंतर कर्मचारी वर्गाने त्यांच्या मागण्यांसाठी संप करणे लोकशाहीमध्ये मान्य आहे. तथापि, चुकीच्या मुद्द्याच्या आधारे संप करणे सर्वांसाठीच नुकसानकारक ठरू शकते.

एका खासगी कंपनीने नवी मुंबई, उरण, पनवेल इत्यादी भागात वीज वितरणासाठी परवाना मागितला आहे, त्यातून महावितरणचे खासगीकरण होईल, असा गैरसमज निर्माण झाला आणि त्याच्या आधारे संप झाला. वस्तुस्थिती अशी आहे की, या कंपनीने वीज कायदा २००३ च्या तरतुदींच्या आधारे या भागात समांतर वीज वितरण परवाना मिळावा म्हणून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे याचिका केली आहे. कायद्यानुसार कोणतीही कंपनी वीज वितरण परवाना मागू शकते. परवाना द्यायचा का याचा निर्णय नियामक आयोग घेतो. महावितरण किंवा राज्य सरकार वीज वितरण परवाना मागण्यापासून कोणत्याही कंपनीला रोखू शकत नाही. आयोगासमोर बाजू मांडण्याचा अधिकार महावितरणला आहे व त्यानुसार कंपनीची बाजू ठामपणे मांडली जाईल. आयोगाकडील सुनावणीची व निर्णय प्रक्रिया पूर्ण होण्याच्या आधीच संप पुकारण्यात आला.

महावितरणची मालकी राज्य सरकारची आहे व त्यामध्ये जोपर्यंत बदल होत नाही तोपर्यंत महावितरणचे खासगीकरण होऊ शकत नाही. वरील क्षेत्रात सध्या महावितरणला वीज वितरण परवाना आहे. तेथे आणखी एखादा परवानाधारक आला तर महावितरणसमोर स्पर्धेचे आव्हान निर्माण होऊ शकते पण महावितरणचे खासगीकरण होऊ शकत नाही. तथापि, मूळ मुद्द्याकडे दुर्लक्ष झाले. संबंधित खासगी कंपनीला समांतर विद्युत वितरण परवाना द्यावा का, याबद्दल महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासमोर सुनावणी होईल, त्यावेळी राज्य सरकार महावितरणची बाजू



मांडेल, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. आपण आयोगासमोरच्या सुनावणीची वाट पाहू या.

खासगीकरण होणार या गैरसमजातून केलेल्या संपामुळे जनतेच्या दरबारात महा वितरणची बाजू कमकुवत झाली. संपावर जाताना काही ठिकाणी खोडसाळपणे फीडर बंद केले गेले व त्यातून संबंधित भागात वीजपुरवठा खंडित झाला. त्यानंतर समाजामध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटल्या. वीज पुरवठा खंडीत झाल्यामुळे ऑक्सिजनची गरज असलेल्या वडिलांना त्रास झाला, याला जबाबदार कोण, इथपासून अनेक संतप्त प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटल्या. त्यात हे असे चालणार असेल तर खासगीकरण करा, अशा स्वरुपाची मागणी देखील काहींनी केली. संपाची समाजात कशी प्रतिक्रिया उमटली याची डोळसपणे नोंद घेणे गरजेचे आहे.

एकेकाळी वीज पुरवठा हा केवळ घरात रात्री दिवे लावण्यापुरता होता. त्यातून वीज पुरवठा खंडित झाला की लाईट गेली असे लोक म्हणू लागले.

पण आता विजेचा उपयोग दिव्यापुरता मर्यादित नाही. पाणी पुरवठा, लिफ्ट, हॉस्पिटल, रस्त्यावरील ट्राफिक सिग्नल, कार्यालयांचे कॉम्प्युटर, बँकांचे आर्थिक व्यवहार, ऑनलाईन शिक्षण या सर्वांसाठी वीज आवश्यक आहे. वीजपुरवठा नाही तर हाहाकार माजेल. पण असे झाले तर लोकांची काय प्रतिक्रिया होईल, याचा विचार वीज कर्मचाऱ्यांनी करावा.

केवळ विजेच्या वापराच्या बाबतीत समाजात बदल झाला आहे, असे नाही. समाजात विविध सेवांबाबत अपेक्षा वाढल्या आहेत. एकेकाळी फोनचे कनेक्शन मिळण्यासाठी खासदाराचा वशीला लावावा लागण्याची वेळ येत असे. फोन कनेक्शनसाठी प्रतीक्षा यादी असे. आता एकेक माणसाकडे दोन दोन मोबाईल फोन कनेक्शन असतात. फोन कनेक्शनसाठी वाट पाहण्याची कल्पनाही करता येत नाही. एके काळी रेल्वे स्थानके अस्वच्छ असत, गाड्या अस्वच्छ असत. आता बदल झाला आहे, सर्वत्र स्वच्छता असते. लोकांना हे हवे आहे. पण आता समाज बदलला आहे. आपल्याला उत्तम सेवा मिळणे हा अधिकार असल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यासाठी अधिक पैसे मोजायलाही लोक तयार आहेत.

एकविसाव्या शतकातील बदलेल्या समाजात आपण संपाचे हत्यार उपसून लोकांची गैरसोय केली तर लोकच खासगीकरणाची मागणी करतील याचे भान ठेवावे.

मुंबईत बेस्ट ही सार्वजनिक कंपनी आणि टाटा व अदानी या दोन खासगी कंपन्या यांचा वीजपुरवठा लोकांना उपलब्ध आहे आणि ग्राहक हव्या त्या कंपनीची वीज घेऊ शकतात. अनेक वर्षे ही पद्धती आहे. मुंबईप्रमाणेच आम्हालाही पर्याय हवेत असे महाराष्ट्रातील वीज ग्राहकांनी म्हटले तर काय करणार? त्यामुळे वीज कर्मचाऱ्यांना माझे आवाहन आहे की, विसाव्या शतकाच्या पद्धतीने विचार करू नका, काळ बदलला आहे, लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत, जनमत आपल्या विरोधात जाईल असे काही करू नका.

वीज क्षेत्रातही अनेक मोठे बदल होत आहेत. घरावर सौरऊर्जा निर्मिती यंत्रणा बसवायची, त्यातून घराची वीजेची गरज भागवायची आणि जास्त वीजनिर्मिती झाली तर महावितरणला विकायची ही कवी कल्पना नाही तर महाराष्ट्रात अनेक घरांमध्ये असलेले वास्तव आहे. सौरऊर्जेच्या बाबतीत ज्या वेगाने संशोधन चालू आहे, वीज साठविण्यासाठी अधिकाधिक कार्यक्षम बॅटऱ्या ज्या प्रकारे निर्माण होत आहेत हे पाहता भविष्यात वीज पुरवठ्यासाठी महावितरण किंवा कोणत्याही खासगी वितरण कंपनीवर लोक अवलंबून राहतीलच असे नाही.

एकीकडे सेवांविषयी वाढलेल्या अपेक्षा आणि दुसरीकडे तंत्रज्ञानातील बदलामुळे निर्माण झालेले आव्हान असा दुहेरी पेच महावितरणसमोर आहे. त्यातून

**विश्वास पाठक**
(स्वतंत्र संचालक - महावितरण)

महावितरणला एकविसाव्या शतकाला अनुरूप बनवून ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करणारी कंपनी होण्यासाठी कंपनीचे व्यवस्थापन आणि मुख्यत राज्य सरकार प्रयत्न करत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारी वीज कंपन्यात पन्नास हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचे दिलेले आश्वासन हे त्याचाच भाग आहे. महावितरणमध्ये कर्मचारी भरती करण्यात येणार आहे. अशा स्थितीत महावितरणला जनतेची पसंती रहावी आणि ही कंपनी स्पर्धेला तोंड देणारी व्हावी तसेच सक्षमपणे चालावी यासाठी आपण सर्वांनी हातात हात घालून काम करण्याची गरज आहे.

कामगारांनी आपल्या समोरचे आव्हान ओळखले पाहिजे. कर्मचारी संघटनांनी महावितरणचे खासगीकरण होऊ नये म्हणून संप पुकारला. पण एका संघटनेचे नेते तीन तीन वर्षे रजा घेऊन खासगी कंपनीचे काम करत होते. तेच सरकारसोबत चर्चेसाठी आले होते.

असे घडले तर कसे होणार, हा प्रश्न आहे. महावितरणसाठी आपण सर्वांनी बांधिलकीने काम केले पाहिजे.

महावितरण ही सरकारी कंपनी टिकणे ही सर्वांची गरज आहे. आपण सर्वजण मिळून ती टिकवू शकतो. तौक्ते वादळ आले, त्यावेळी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वीज पुरवठा सुरळीत केला. अशी अनेक आव्हाने कंपनीच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पेलली आहेत. जनतेशी थेट संपर्क आणि महावितरणचे सामर्थ्य अनुभवी मनुष्यबळ हे आहे. महावितरण टिकविण्यासाठी आपल्याला एकविसाव्या शतकातील आव्हानांची जाण ठेवायला हवी. लोकांच्या अपेक्षा बदलल्या आहेत, हे ध्यानात घ्यायला हवे. सरकार, व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांनी हातात हात घालून काम करायला हवे. कर्मचाऱ्यांनो जागे व्हा ! ◆◆◆

**जाहिरातीसाठी**
**'कर्मचारी टाइम्स'** मध्ये
जाहिरात देण्यासाठी
**संपर्क** - श्री. संजय वारुळे
९९८७९१४५४६,
७०२१६२३६७०

# संपामध्ये सर्व कर्मचाऱ्यांचा होणार समावेश

**मुंबई :** जर मार्च २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात जुनी पेन्शनची तरतुद न केल्यास, राज्यातील सर्व जिल्हा परिषद, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, नगर पालिका, महानगरपालिका, महामंडळातील कर्मचारी एकत्र येवून लढा उभा करणार आहेत. या होणाऱ्या संपामध्ये आता महाराष्ट्र राज्यातील जवळपास १०० टक्के कर्मचारी वर्गात सहभाग राहिल, हे स्पष्ट आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिक्षण क्षेत्रात अधिक बळकटी आणण्यासाठी त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे. पेन्शन योजना हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय असून तो निवृत्तीनंतर अत्यंत गरजेचा आहे. अन्य राज्यांमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे.

यात हिमाचल प्रदेश, राजस्थान, पंजाब आदी राज्यांचा समावेश आहे. त्यामुळे देशात महत्वाचे राज्य असलेल्या महाराष्ट्रानेही हा निर्णय त्वरित लागू करण्यात यावा, अशी मागणी शिक्षक वर्गाकडून होताना दिसून येत आहे. त्याकडे लक्ष वेधण्यासाठीच हे आंदोलन असल्याचे सांगण्यात आले आहे.

दरम्यान या सर्व शिक्षकांच्या प्रश्नांबाबत आमदार प्रशांत बंब यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहे. मात्र ते काही ठराविक ठिकाणीच आहेत. त्यामुळे जिथे हे प्रकार घडत आहेत, तिथे सुधारणा होईलच परंतु त्यामुळे इतर ठिकाणच्या शिक्षकांवर अन्याय नको, असेही त्यांचे शिक्षकांचे म्हणणे आहे.

राज्य शासन सेवेतील ग्रामपातळीवर कार्यरत कर्मचारी यांना मुख्यालयी राहणे हे शासकीय नियम व कायद्यानुसार बंधनकारक करण्यात आलेले आहेत. कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी रहावे याकरीता अनेक शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहे. यासंदर्भात औरंगाबाद येथील विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार यांनी प्रशासनास जाणून करुन देण्यात आली आहे कि, कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक करावे. याबाबत राज्य प्रशासनाकडून दि. २७.१२.२०२२ रोजी एक पत्रक निर्गमित करण्यात आलेले आहेत. विधानसभा सदस्य आमदार श्री. प्रशांत बंब यांनी नमुद केले आहे कि, कर्मचारी मुख्यालयी न राहता ही बाब केवळ कागदोपत्रीच ठेवून हसी मजाक बनवून ठेवली आहे. गावांतील बहुतांश विकास जो थांबलेला व थांबत आहे.

### कर्मचाऱ्यांचा विरोध

**मुंबई :** राज्य शासनाच्या वर्ग अ, ब, क मधील पदांसाठी सेवानिवृत्तीचे वय हे ५८ वर्षे आहे. तर वर्ग ड करीता सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे आहे. देशांमध्ये केंद्र सरकारने त्याचबरोबर इतर राज्यांनी सेवानिवृत्तीच्या वयांमध्ये २ वर्षे वाढ करुन ६० वर्षे करण्यात आले आहे.

याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे इतकी करण्यात यावी, अशा स्वरुपाची कर्मचाऱ्यांची मोठी मागणी आहे. परंतु काही कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याला विरोध आहे. यामुळे सरकारला ठोस निर्णय घेवू शकत नाही.

# विमान प्रवास सवलत

**मुंबई :** राज्य शासन सवेत कार्यरत अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना विमान प्रवास सवलत अनुज्ञेय करण्याबाबत वित्त विभागाने याबाबत दिनांक १६ डिसेंबर २०२२ रोजी असे करणे. महत्वपुर्ण शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

या संदर्भातील वित्त विभागाचा दि.१६ डिसेंबर २०२२ रोजीचा सविस्तर शासन निर्णय पुढीलप्रमाणे पाहूयात. याबाबत न्यायालयीन व विधीमंडळाशी संबंधित कामकाजाव्यतिरिक्त अन्य अत्यावश्यक शासकीय कामकाजासाठी मंत्रालयीन / क्षेत्री अधिकारी व कर्मचाऱ्यांना विमान प्रवास करण्यास परवानगी देण्यात येत आहे . यामध्ये अन्य कोणत्याही साधानाने / मार्गाने नियोजित



ठिकाणी ठरलेल्या किंवा विहित वेळेत पोहचणे हे शक्य होत नाही. संबंधित प्रशासकीय विभागाच्या सचिवांची पुर्वपरवानगी घेवून विमान प्रवास करता येणार आहे. तसेच परतीच्या प्रवासासाठी ही सवलत अनुज्ञेय असणार नाही. अपवाद परिस्थितीत परत येणे तातडीचे असले तर संबंधित विभागाच्या सचिवांची लेखी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असणार आहे.

याबाबत काहीजणांनी या विरोधी प्रतिक्रिया दिल्या असल्या तरी वास्तव समजून घेतले पाहिजे.

विमान प्रवास हा काही चैनीचा भाग नाही तर काम अधिक जलदगतीने व्हावे तसेच प्रश्नांची सोडवणूक लवकरात लवकर व्हावी, या हेतूने सुविधा दिली जात आहे.

# विवाहित महिला कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय खर्चाचा निर्णय जारी

**मुंबई :** वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व्हावी, यासाठी विवाहित महिला शासकीय कर्मचाऱ्यांना तिच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या आणि तिच्या बरोबर राहत असलेल्या तिच्या आई वडीलांची किंवा तिच्या सासू सासऱ्यांची निवड करणेबाबत राज्याच्या आरोग्य विभागाकडून महाराष्ट्र शासन निर्णय दि. १४ फेब्रुवारी २०२२ रोजी निर्गमित झालेला आहे.

याबाबत विवाहित महिला कर्मचाऱ्यांचे आई वडील किंवा सासू सासरे या दोघांपैकी एकाच्या वैद्यकीय आजारावरील खर्च प्रतिपूर्तीचा लाभ घेण्यापूर्वी त्यांची वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीकरीता निवड केली आहे, असे अर्जाद्वारे ती महिला कर्मचारी सेवेत कार्यरत असलेल्या विवाहित महिला शासकीय कर्मचारी हिला कार्यालयास लेखी कळविणे बंधनकारक आहे. तसेच संदर्भात अर्ज प्राप्त झाल्यावर संबंधित कार्यालयाने त्या कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात अर्जाबाबत दिनांका सहीत नोंद घेणे बंधनकारक असणार आहे.

विवाहीत असलेल्या महिला शासकीय कर्मचाऱ्यांस तिने आई वडील किंवा सासू सासरे या दोघांपैकी एकाची निवड खर्च प्रतिपूर्तीचा लाभ घेण्यासाठी लाभ घेण्यासाठी ती करीत आहे, असे ज्या दिनांकास कळविले आहे. त्या दिनांका पासून फक्त पुढील कालावधीत संबंधितांनी (आई वडील किंवा सासू सासरे या दोघांपैकी एक) घेतलेल्या वैद्यकीय उपचाराच्या खर्चाची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येईल. शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या विवाहित महिला विवाहित महिला कर्मचाऱ्यांची गेल्या अनेक वर्षांपासूनची ही समस्या होती. त्याबाबत वारंवार मागणी देखील करण्यात आली होती. आता या प्रश्नाची सोडवणूक झाल्याबद्दल विवाहित महिला कर्मचाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

### महाराष्ट्रातील एएनएम कर्मचारी पुन्हा सेवेत

**कणकवली :** केंद्रिय उद्योग मंत्री नारायण राणे यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानात महाराष्ट्र राज्यातील ५१७ आरोग्य सेविकांची पदे सरकारकडून मंजूर करून घेतली आहेत. अभियानांतर्गत राज्यातील सेवेतून कमी केलेल्या ५१७ आरोग्य सेविकांना (एएनएम) सेवेत पुन्हा रुजू करून घेण्यात आले आहे. जिल्ह्यातील सेवेतून कमी केलेल्या २० आरोग्य सेविकांसह राज्यातील ५१७ कर्मचारी आहेत.

ही सर्व पदे पुन्हा मंजूर करून दिली आहेत. तसे आदेश राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि आरोग्य सेवा आयुक्त तसेच संचालक यांनी कळवले आहे.

# कर्करोग नियंत्रणासाठी आरोग्य विभागांना प्रशिक्षण

## लोकांना फायदा होण्याकरिता काम करणार : सुषमा तायशेट्ये

**सिंधुदुर्गनगरी :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात कर्करोग प्रतिबंध व नियंत्रण आरोग्य विभाग सर्व स्तरावरील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेऊन अधिकाधिक लोकांना याचा फायदा होण्याकरिता काम करणार आहे, त्यासाठी नजीकच्या जिल्ह्यातील कर्करोग रुग्णालयांची मदत घेतली जाणार आहे, जेणेकरून या उपक्रमाची अंमलबजावणी करता येईल, असे मत सहसचिव सुषमा तायशेट्ये यांनी व्यक्त केले.



सिंधुदुर्ग जिल्हा येथे सार्वजनिक आरोग्य विभाग, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग व टाटा मेमोरियल रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य सेवा सुरु करण्याच्या उद्देशाने व केमोथेरपी डे केअर आरोग्य सेवा अधिक प्रमाणात कार्यरत करण्यासाठी शरद कृषी भवन येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हाधिकारी के. मंजुलक्ष्मी, टाटा ममोरियल सेंटरचे संचालक डॉ. श्रीपाद बनावली, डॉ. अतुल बुद्दुक, डॉ. अभय देसाई, डॉ. सुवर्णा गोरे, डॉ. राहुल सोनावणे, डॉ. अमेय ओक, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. श्रीपाद पाटील, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संदेश कांबळे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. श्याम पाटील, बाह्य संपर्क कार्यक्रम अधिकारी डॉ. सुबोध इंगळे, दयानंद कांबळी आदी मान्यवर उपस्थित होते.

राज्यातील कर्करोगाचे वाढते प्रमाण पाहता सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यात लोकसंख्येवर आधारित कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्यात ३० वर्षांवरील सर्व महिलांना स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग तसेच मुख कर्करोग हा प्राथमिक टप्प्यात असतानाच त्याचे निदान झाले अथवा त्यासाठी तपासणी झाली तर तो आटोक्यात येऊ शकतो. त्यामुळे त्याची जनजागृती करण्यावर सध्या शासनाच्या वतीने भर दिला जात आहे. त्याचबरोबर ही सेवा अधिक प्रभावी राबविण्यासाठी टाटा रुग्णालयासारख्या संस्थांची मदत घेण्यात येत आहे. यात अशा संस्थांचा सहभाग घेणे आवश्यक असून त्यातून या मोहीमेची व्याप्ती वाढणार आहे.

# ७५ हजार पदांच्या भरतीच्या ब्रेक?

## सुसूत्रता नसल्याने ३ ते ४ वर्गाच्यां पदांची विभागीय भरती खोळंबली

**मुंबई :** भरती प्रक्रियेत कुठलीही सुसूत्रता नसल्याने राज्य सरकारने जाहीर केलेल्या ७५ हजार पदांच्या भरतीच्या वेगाला ब्रेक लागणाच्यी चिन्हे आहेत. विविध खात्यांमध्ये रिक्त असलेल्या वर्ग ४ आणि ४ च्या पदांची भरती महसूल विभागीय स्तरावर करण्याचा निर्णय घेण्यात आला आले. यासाठी शासनाच्या प्रत्येक महसूल विभागात प्रत्येक खात्याचे प्रादेशिक नियुक्ती अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. काही खात्यांमध्ये प्रत्येक महसूल विभागात केवळ १ ते २ समान पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांसाठी प्रत्येक महसूल विभागात स्वतंत्र जाहिरात प्रसिद्ध करणे, भरती प्रक्रिया राबविण्यासाठी कंपन्या बरोबर स्वतंत्र करार करणे आणि प्रत्येक शासकीय विभागात समान पदांसाठी वेगळी परीक्षा घेणे ही सर्व प्रक्रिया राबवावी लागत आहे. त्यासाठी सरकारने टीसीएस आणि आयबीपीएस या कंपन्याची नियुक्ती केली आहे. एक-दोन पदांसाठी संपूर्ण भरतीची ही प्रक्रिया राबविणे, ही या कंपन्यांसाठी डोकेदुखी ठरत असून, ती वेळखाऊही आहे.

उदाहरण द्यायचे झाले तर कोकण महसूल विभागात पशुसंवर्धन खात्यात एका पदाची भरती करायची आले, तर पशुसंवर्धन विभागत त्याच पदासाठी कोल्हापूर महसूल विभागात भरती करायची आहे. यासाठी कोकण आणि कोल्हापूर विभागात भरती प्रक्रिया राबविण्यासाठी त्या विभागाच्या प्रादेशिक नियुक्ती अधिकाऱ्याला भरती प्रक्रिया राबविणाऱ्या कंपनीबरोबर वेगवेगळे करार करावे लागणार, त्यानंतर भरती प्रक्रिया पूर्ण केली जाणार असे चित्र असून यामुळे भरती प्रक्रिया लांबण्याची चिन्हे आहेत.

**प्रक्रियेचा वेग कसा येणार ?**

१.महसूल विभागाच्या विभागीय स्तरावर रिक्त पदांची माहिती मुख्यालयाकडून मागवण्यात यावी आणि सर्व राज्यांसाठी एकत्रित भरती प्रक्रिया राबविण्यासाठी या कंपन्या बरोबर एकत्रित करार करावा. असा सांगितला.

२.लिपिक आणि टंकलेखक यांच्या विविध स्तरावरील महसूल विभागात रिक्त जागांची माहिती मुख्यालयातून मागवण्यात येते. प्रत्येक महसूल विभागाकडून आलेली रिक्त पदांची माहिती एकत्रित करुन या पदांच्या भरतीसाठी कंपन्या बरोबर मुख्यालयातून एकत्रित करार जातो आणि या कंपन्या एकत्रित परीक्षा घेतात आणि वेगाने भरती प्रक्रिया पूर्ण होते.

३. अशाच प्रकारच्या पद्धतीने रखडलेल्या ३ आणि ४ वर्गाच्या रिक्त पदांच्या भरतीसाठी सर्व महसूल विभागात असलेल्या मुख्यालयांनी रिक्त पदांची एकत्रित माहिती मागवली आणि मुख्यालयातूनच कंपन्या बरोबर एकत्रित करार करुन भरती प्रक्रिया राबवली तर भरती प्रक्रिया वेगाने पूर्ण होईल. तरी याबाबत लवकरात लवकर कार्यवाही व्हावी, अशी मागणी होत आहे.

### कृषी विभागाच्या वतीने वनराई बंधारा

**दोडामार्ग :** आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष तसेच रब्बी क्षेत्र वाढीव मोहीम तसेच एकात्मिक पाणलोट विकास योजनेच्या अंतर्गत निवड केलेल्या परमे गाव येथे कृषी विभागाच्या वतीने ग्रामस्थ मंडळांच्या सहभागाने वनराई बंधारा बांधण्यात आला. गावाच्या मंदिरानजीकच्या ओढ्यावर बंधारा बांधल्याने पाण्याचा प्रवाह थांबून पाणी जमिनीत पाणी पातळीमध्ये वाढ होणार आहे.

सदर बंधाऱ्याची निर्मिती दोडामार्ग तालुका अधिकारी प्रमोद बनकर, परमे कृषी सहाय्यक साईराम शिंदे, कृषी पर्यवेक्षक अजित कोळी यांच्या उपस्थितीत करण्यात आली. तृण धान्याचे आहारातील महत्व, बदलती खाद्य पद्धती यामुळे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

# बोगस बीएमसी कर्मचारी गजाआड

## मुंबई पोलिसांची मुंब्र्यात कारवाई; अनेक गुन्हांची होणार उकल

**ठाणे :** पुढे नाकाबंदी सुरु आहे, मी बीएमसीचा कर्मचारी आहे, आपला मौल्यवान ऐवज काढून ठेवा, असे सांगून हातचलाखीने नागरिकांचा सोन्याचा ऐवज, किमती मुद्देमाल पळवणाऱ्या सराईत आरोपी अली झहूर जाफरी ऊर्फ मोटा (३७, रा. मुंब्रा) याला बेड्या ठोकवण्यात आल्या आहेत.

मुंबई पोलीस दलाच्या खार पोलिसांनी मुंब्रा परिसरात केली. या आरोपीविरुद्ध ठाणे, मुंबई, नवी मुंबईत १९ गुन्हे दाखल असून आणखी अनेक गुन्हे उघडकीस येतील, अशी शक्यता असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

खार परिसरात राहणारे राजू पुकले (५०) हे उषा किरण सोसायटीच्या अगदी जवळून जात असताना जाफरी याने अडवले. नागरिकांची लूट होत असल्याने पुढे नाकाबंदी सुरु आहे. मी महापालिकेच्या अधिकारी आहे, असे सांगून जाफरी याने पुकले यांचा विश्वास संपादन केला.

त्याच्यावर विश्वास ठेवत पुकले यांनी सोन्याचा ऐवज काढून कागदावर बांधून पिशवीत ठेवला. बोलण्यात गुंतवून जाफरी याने हातचलाखीने कागदातील ऐवज पळवला. दरम्यान, ऐवज चोरीला गेल्याचे समजताच त्यांनी खार पोलीस ठाण्यात तक्रार केली.

मुंबईत अनेकांची लूट झाल्याने आरोपीला तत्काळ अटक करण्याच्या सूचना वरिष्ठांना दिल्या. त्यानुसार वपोनि मोहन माने यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक अविनाश नडविनकेक्षरी, हवालदार मोहिते, अंमलदार मुळे, निकम, मलतवाडकर पाटील, जाधव, गोडसे, लहमगे, गळवे, शिंदे व गवळी आदी पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान या पथकाने ४० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले त्यात आरोपीने ४ वेळा रिक्षा बदलत मुंब्रा गाठल्याचे लक्षात आले. त्या माहितीच्या आधारे पोलिसांनी मुंब्रा परिसरातील रशिद कपाऊंड मधील सानिया टॉवरमध्ये सापळा लावला.

त्यावेळी राहत्या घराच्या मुख्य दरवाजाच्या ग्रीलला टाळे होते. जाफरी घरात असल्याची माहिती पोलिसांना असल्याने त्यांनी घराचे टाळे तोडले, असता तो घरात आढळून आला. पोलिसांनी त्याला अटक केली.

### कामगार कल्याणासाठी महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशमधील मंत्र्यांमध्ये संवाद

# महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण योजना अनुकरणीय

## उत्तर प्रदेशाच्या मंत्र्यांकडून कौतुक

**मुंबई :** राज्यातील कामगारांच्या सर्वांगीण विकासासाठी उत्तर प्रदेश राज्य आणि महाराष्ट्र शासनाच्या सुरु असलेल्या तसेच नवीन योजनांवर राज्याचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे आणि उत्तर प्रदेशचे श्रम व रोजगार मंत्री अनिल राजभर यांच्यात चर्चा झाली. यावेळी मंत्री अनिल राजभर यांनी महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण योजना अनुकरणीय आहेत, असे कौतुक करून डॉ. खाडे यांना उत्तर प्रदेश भेटीचे निमंत्रण दिले.

मंत्रालयात झालेल्या या बैठकीत दोन्ही राज्यातील कामगारांसाठीच्या विविध कल्याणकारी योजनांच्या माहितीचे आदान-प्रदान करण्यात आले. यावेळी डॉ. सुरेख खाडे हे विभागाच्या महत्वाकांक्षी योजनांची माहिती देताना म्हणाले, दोन्ही राज्यातील कामगार व त्यांच्यासाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजना राबवत आहे.

कामगार विभागाची सर्व कार्यालये आता एकाच छताखाली आणण्याबाबत कामगार भवन आणि कामगार विमा योजना (ईएसआयसी) रूग्णालये उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. कामगारांना हक्काचे घर मिळावे यासाठी प्रधानमंत्री घरकुल योजनेच्या अंतर्गत नोंदणी केलेल्या कामगारांना घरकुल देण्याबाबत तसेच कामगारांच्या मुला-मुलींसाठी क्रीडा संकुल योजना राबवण्याचा मानस आहे. ५५ वर्षांवरील घरेल नोंदणीकृत असलेल्या कामगारांना १० हजार रुपये इतकी आर्थिक मदत देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

या कामगारांना सुविधा देण्यासाठी राज्य शासनाकडे पुरेसा निधी उपलब्ध आहे. यासोबतच सामाजिक उत्तर दायित्व म्हणजेच सीएसआर निधी असलेल्या माध्यमातूनही कामगार कल्याणासाठी निधी उपलब्ध केला जात आहे. राज्याचा कामगार विभाग उत्तमरीत्या काम करीत असल्याचे डॉ. खाडे यांनी यावेळी सांगितले. मंत्री अनिल राजभर यावेळी म्हणाले, कामगारांसाठी चांगले काम करणाऱ्या कामगारांच्या योजना, उपक्रमांच्या माहितीचे आदान-प्रदान, संवाद होणे गरजेचे आहे. उत्तर प्रदेश सरकारने त्यांच्या श्रमिक कामगारांच्या मुली-मुलींना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर अटल आवासी विद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. इतर राज्य व देशांतील योजनांच्या माहिती आदान-प्रदान, सवांद होणे गरजेचे आहे. शासनाचे बांधकाम कामगारांसाठीच्या घरकुल योजनेची स्तुती करुन उत्तर प्रदेशात योजना राबविण्याचा मानस असल्याने सांगितले.

**शाळांमधील शिपायाचे पद रद्द करण्याबाबत शासकीय स्तरावर जोरदार चर्चा होती. त्यावेळी लिहिलेली कविता. पण शासकीय कर्मचारी असलेल्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचेदेखील चित्र स्पष्ट होते. म्हणूनच वाचकांसाठी सादर करत आहोत.**

### शासनाचा निर्णय झाला...

शासनाचा निर्णय झाला...
आणि शाळा शाळांमधील
भविष्यातील शिपाई मामा
नेमणूकीपासून दूर झाला
खरतरं शिपाई मामा
असतोच शाळेची शान
रोज सकाळी शाळेतील
स्वच्छता करतो तो छान
त्याच्याच बेलने शाळेची
सुरुवात होते महान
साहेबांपासून मुलांपर्यंतचा
तो मित्र असतो छान
शाळेच्या कार्यक्रमाची
शोभा वाढवतो मामा
मात्र सत्कार समारंभावेळी
सन्मानात कायम रिकामा
लहानबाळांच्या दुःखाने
तो लगेच व्याकूळ होतो
शाळेपासून घरापर्यंतचा
उत्तम दोस्त बनून जातो
भूकेने व्याकूळलेल्यांसाठी
तो स्वतःचा डबा देतो
टेन्शन आलेल्या साहेबांचा
तोच नेहमी आधार असतो
सर्व फाईली, सर्व टॅग,
तोच व्यवस्थित जपतो
काहीवेळी निर्णयातही
तो आधार बनून जातो
तोच भविष्यातला मामा
आता दिसणार नाही
साहेबांसहित स्टाफचा
आधार उरणार नाही
असा तुमचा आमचा सखा
नेमणूकीत असणार नाही
खऱ्या अर्थाने शाळेची शान
पुन्हा आता दिसणार नाही
तो शाळेत दिसण्यासाठी
निर्णय बदलला पाहिजे
शिपाईमामा नेमला पाहिजे
आधारवड जगला पाहिजे
यासाठी सर्व संघटना
जिवंत असल्या पाहिजेत
अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी
त्या पुढे आल्या पाहिजेत
एवढच बाकी काय....

शब्दरचना
**यशवंत आ. गायकवाड**
सातारा जिल्हा
माध्यमिक शिक्षक संघ,
सातारा.

# शासकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रदान

**मुंबई :** शासकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रदान करण्याच्या हेतुने भारतीय दंड संहिता मध्ये काही नियम व कायदे तयार करण्यात आलेले आहेत.

या नव्या कायद्यांनुसार कर्मचाऱ्यांना अधिक सुरक्षा प्रदान होते. इंडियन पिनल कोड मध्ये सदर नियम लागू करण्यात आलेले आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षा विषयक सविस्तर कायदे पुढीलप्रमाणे पाहूयात संहिता - ३५३ च्या अनुसार : शासकीय कामकाजामध्ये जर कोणी व्यत्यय आणत असेल तर अशा विरुद्ध भारतीय दंड संहिता - ३५२ नुसार कार्यवाही होते. सदर गुन्हेगारास दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा नमुद आहे. यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांना कामकाज करत असताना काम करताना सुरक्षा प्रदान होते.

त्याचबरोबर शासकीय कर्मचाऱ्यांशी वाद घालणे अथवा अपशब्द वापरणे हे देखिल ५०२ नुसार गुन्हेस पात्र आहे. वाद घालणाऱ्या गुन्हेगारास २ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सदर कायद्यानुसार नमुद आहे. त्याचबरोबर हल्ली शासकीय कर्मचाऱ्यांना धमकी देण्याचे अनेक प्रकार घडत आहे , परंतु धमकी देणे हा एक मोठा गुन्हा आहे. शासकीय कर्मचारी याला एखाद्या व्यक्तिने धमकी दिल्यास सदर धमकी देणारा व्यक्ती हा - ५०६ नुसार ३ ते ७ वर्षे सश्रम कारावासास पात्र राहतो.

त्याचबरोबर शासकीय कर्मचाऱ्यांना मारहाण केल्यास, भारतीय दंड संहिता २३२, ३३३ नुसार ३ वर्षे ते १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा तर सहा महिने जामीन मिळत नाही. त्याचबरोबर शासकीय कर्मचाऱ्यांस खंडणी मागणे / ब्लॅकमेल करणे, हे भारतीय दंड संहिता ३८३, ३८४, ३८६ यानुसार गुन्हेगारास दोन ते दहा वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा होते.

शासकीय कार्यालयात जोरजबरदस्तीने प्रवेश करणे ४२७ नुसार गुन्हेगारास २ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा होते. तर शासकीय मालमत्तेचे नुकसान करणे हे भारतीय दंड संहिता ३७८, ३७९ नुसार सश्रम कारावासाची शिक्षा होते. त्याचबरोबर शासकिय मालमत्तेचे अथवा दस्ताऐवजाची चोरी केल्यास ३ वर्षे तर मालमत्तेचे नुकसान केल्यास ३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा होते .

शासकीय कामकाजात अर्वोच्च शिवीगाळ किंवा गोंधळ करून अडथळा निर्माण केल्याबद्दल भारतीय दंड संहिता १४६,१४८,१५० नुसार ६ महिने ते २ वर्षापर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा होते. त्याचबरोबर शासकीय कार्यालयावर अथवा आवारात अनधिकृतरित्या नुकसाना-साठी हिंसक जमाव गोळा केल्यास ६ महिने ते २ वर्षा-पर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा होते .

## केंद्रीय कर्मचाऱ्यांना आनंदाची बातमी

**मुंबई :** केंद्र सरकारकडुन मिळणार आहे. कारण केंद्र सरकारकडुन केंद्रीय कर्मचारी त्याचबरोबर पेन्शनधारक कर्मचाऱ्यांना आठवा वेतन आयोग लागु करण्याची मोठी शक्यता आहे.

केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनामध्ये ३.६८ पट वाढ करण्यात येणार असल्याने, केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या मुळ वेतनांमध्ये ८ हजार रुपयांची वाढ होणार आहे.

वेतन आयोगाच्या नियमानुसार दर ८-१० वर्षांनी कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये सुधारणा करण्यात येते. सन २०१६ मध्ये सातवा वेतन आयोग लागु होता, यामुळे कर्मचाऱ्यांना आठवा वेतन आयोगाची चाहूल लागली आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांना ३०० कोटींचा निधी



**मुंबई :** एसटी कर्मचाऱ्यांना नोव्हेंबर २०२२ मधील थकीत पगार मिळावा, यासाठी उच्च न्यायालयातील याचिकेतील निर्णयानंतर सरकारच्या वतीने यासाठी ३०० कोटी इतक्या रुपयांची व्यवस्था उपलब्ध करून दिला गेला. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांचा वेतनाचा प्रश्न सुटला असला तरी यापुढील काळात शाश्वत उपाययोजना करण्यासाठी भर दिला गेला पाहिजे, असे मत कर्मचारी व संघटनांकडून व्यक्त होत आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना प्रत्येक महिन्याच्या ७ ते १० तारखेच्या दरम्यान वेतन देण्यात यावे, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या वतीने त्रिसदस्यी समितीने सरकारला दिले आहेत. एसटी कर्मचाऱ्यांना पगार वेळेत मिळत नसल्यामुळे किमान वेतन मिळावे, यासाठी एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांनी न्यायालयात दाद मागितली होती. न्यायालयाच्या आदेशानुसार आता राज्य सरकारने नोव्हेंबर २०२२ मधील एसटी कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी ३०० कोटींची व्यवस्था सरकारच्या वतीने करण्यात आली आहे तसेच यापुढे प्रत्येक महिन्याच्या ७ ते १० तारखेच्या दरम्यान वेतन दिले जाईल, असे निवेदनदेखील सरकारच्या वतीने न्यायालयात दिले आहे. त्यामुळे यापुढील काळात वेतनाची समस्या मिटेल, अशी आशा कामगारांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

शासनदेखील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील राहून त्यांची सोडवणूक वेळेत करेल, असा ठाम विश्वास कामगार वर्गाकडून व्यक्त होत आहे.

# साडे तेरा हजार पदांच्या भरतीचा ४ वर्ष खोळंबा

### जिल्हा परिषद भरती तीनदा पुढे ढकलल्याने तरुणांमध्ये असंतोष

### १२ लाख जणांनी भरलेल्या २५ कोटी रुपयांचे काय?

मुंबई : राज्यातील जिल्हा परिषदेमधील भरती मागील साडेतीन वर्षांहून अधिक काळ रखडली असून, तीन वेळा ही भरती पुढे ढकल्यानंतर रद्द करण्यात आली आहे. तीन सरकारच्या काळात ही भरती इच्छुक तरुणांमध्ये प्रचंड असंतोष आहे. आता राज्य सरकारने यातील केवळ आरोग्य विभागाच्या भरतीचे वेळापत्रक जाहीर केले असून, उर्वरित पदांच्या भरतीचे काय, ज्या उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज करुन अर्जाची रक्कम भरली आहे त्याचे काय, असा प्रश्न उमेदवार विचारत आहेत.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना २६ मार्च २०१९ रोजी जिल्हा परिषदेच्या १३,५२१ जागांच्या भरतीची जाहिरात प्रसिद्ध केली. महाविकास आघाडी सरकारने १४ जून २०२१ रोजी परिक्षेचे वेळापत्रक जाहीर करुन ते २८ जून २०२१ रोजी रद्द केले. २८ ऑगस्ट २०२१ रोजी पुन्हा वेळापत्रक जाहीर करुन ते सप्टेंबर २०२१ रोजी रद्द केले. १० मे २०२२ पुन्हा एकदा वेळापत्रक जाहीर केले. नंतर शिंदे-फडणवीस सरकारने पुन्हा २६ ऑगस्ट २०२२ रोजी वेळापत्रक जाहीर करुन १९ सप्टेंबर रोजी रद्द केले.

भरतीसाठी अर्ज भरलेल्या उमेदवारांचे वय दिवसेंदिवस वाढत असून, भरती होत नसल्याने तरुणांमध्ये नैराश्य आले आहे. रखडलेली ही भरती तत्काळ करण्यात यावी.

२९ ऑक्टोबर २०२२ रोजी शिंदे-फडणवीस सरकारने ही संपूर्ण भरती प्रक्रियाच रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. महोपोर्टल रद्द झाल्याने आणि कोरोना अशा कारणांमुळे ही भरती प्रक्रिया रखडली होती.

# जय त्रिपुरसुंदरी !!

पान २ वरुन ...

विजय नांदेकर यांनी माऊथ ऑर्गनवर पाश्चात्य संगीत सादर केले. रॉकस्टार अभिजित काटे यांनी गिटार वाजवून पाश्चात्य गाणे सादर केले.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायनाने झाली. परंतु, संपदा दाते यांनी स्वरांशी असलेला लगाव आपल्या सादरीकरणात पूर्णतः ओतला. अरुण सांळुखे या गुणी गायकानेदेखील विठ्ठल आवडी प्रेमभावो हे भजन सादर करुन, त्रिपुरावासीयांना पंढरपूर वारी घडवली.

उप शास्त्रीय गायनानंतर लोकगीत एकल या प्रकारात बाळासाहेब सावंत यांनी अख्खा हॉल डोक्यावर घेतला. बाळासाहेबांनी पोतराज आलाय भेटीला हा गोंधळ सादर केला. त्यांनी लावलेल्या पहिल्या टीपेच्या स्वराने सभागृह दणाणून गेले. स्टेजवर बाळासाहेबांचा परफॉर्मन्स आणि स्टेजच्या खाली प्रेक्षकांचा नृत्यगोंधळ यांची जुगलबंदी सुरु होती. बाळासाहेबांनी पोतराजचा पेहराव करुन ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवले. लोकसंगीत समूह गायन या प्रकारात सुधीर पालांडे, योगेंद्र केंजळे, अझीम राज, दिलीप मोहरे, जितेंद्र धनू, उषा धनू, मीना सोलापुरे, ललिता रेंगडे या गायक कलाकारांनी आणि भरत लब्दे, राजेश मांजरेकर, विश्राम कुलकर्णी या साथसंगत करणाऱ्या कलाकारांनी आई त्रिपुरभैरवी शिवशक्ती पाव गे हा गोंधळ सादर केला. सुधीर पालांडे यांनी घातलेली आई त्रिपुरभैरवी शिवशक्ती पाव गे, ही साद साक्षात त्रिपुरा राज्याची देवी त्रिपुरसुंदरीच्या मंदिरापर्यंत गेली. देवीचा आशीर्वाद मिळाला. संघाला रजत पदक प्राप्त झाले.

अक्षया बनसोडे यांनी शास्त्रीय नृत्य (कथ्थक) सादर केले. उत्कृष्ट अदाकारी आणि पदन्यास यांनी नटलेले नृत्य प्रेक्षकांना मनमुराद आनंद देऊन गेले. त्यानंतर उमेश कांबळे या कलाकाराने 'आली हासत खेळत माझी लंका आई...' सादर करुन हॉल जिंकला. प्रेक्षकांच्या शिट्यांनी हॉल दणाणून गेला होता.

लोक नृत्य एकल नंतर पाश्चात्य नृत्य एकल स्पर्धा होती. यामध्ये वर्षा रोठे यांनी 'प्यार के संगीत में... मोहिनी..' या गाण्यावर मायकल जॅक्सनचे नृत्य सादर केले. वर्षा रोठे यांचे सादरीकरण व्यावसायिक कलाकाराला लाजवेल या प्रतीचे होते. तिने केलेला पेहराव, तिचे सौंदर्य आणखी खुलवत होता. वर्षा रोठे रबरच्या लवचिकतेने नृत्याच्या स्टेप्स करत होती. तिच्या अंगात मायकल जॅक्सन संचारला होता. या नृत्यासाठी तिने विविध प्रकारच्या प्रॉपर्टीज कौशल्याने हाताळल्या.

कार्यक्रमाचा शेवट समूह लोकनृत्य स्पर्धेने होणार होता. महाराष्ट्र संघाने डांगी (माता तोरे शारदे खेळे नव रतारे ---) लोकनृत्य सादर केले. यातील कलाकार होते - उमेश कांबळे, प्रसाद पवार, विशाल जाधव, स्वप्नील गायकवाड, मंगल नाखवा, वर्षा रोठे, धनश्री चव्हाण, नम्रता वैष्णव. कोरिओग्राफर सुमीत कदम तसेच सहकोरिओग्राफर दर्शना पेडणेकर यांची मेहनत दिसत होती. शेवटचा दिवस लघुनाट्याचा होता. नाटक होते दंगल सुरु आहे. नाटकाच्या नावाप्रमाणेच स्टेजवर अक्षरशः दंगल सुरु होती. नाटकात तब्बल १६ कलाकार होते. लेखक आशिक पाथरे तर दिग्दर्शक परेश पाटील, साई शिरसेकर होते. सुर्यकांत घरत व देवदत्त राऊत यांच्या नेपथ्याने नाटक आणखी जिवंत झाले. नाट्य सचिव अरविंद शेटच्ये हे सुद्धा कलाकाराच्या भूमिकेत होते. त्यांनी वृद्ध बापाची वठवलेली भूमिका सर्वांची वाहवा मिळवून गेले. त्यांच्या परिचितांनीसुद्धा त्यांना ओळखले नाही.

प्रियांका ठाकरे या मूळात नृत्य कलाकार असलेल्या कलाकाराने या नाटकात बालकलाकाराची भूमिका वठवली होती. नृत्याप्रमाणे तिचा अभिनयातला टायमिंग अचंबित करणारा होता.

देवयानी नगरकर, यतीन तोसकर, दिवाकर मोहिते यांनी अभिनय अक्षरशः चोपला. देवयानी नगरकर यांना अभिनयाचे सुवर्ण पदक मिळाले. प्रियांका ठाकरे यांना बालकलाकाराचे कांस्य पदक मिळाले. ◆

## दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची दमदार वाटचाल : रमेश लव्हांडे

पान १ वरुन ...

लव्हांडे, अजित न्यायनिर्गुणे, जितेंद्र पडेलकर, शशिकांत साखरकर, रविंद्र तिर्लोटकर, शरद वणवे, सतीश जाधव, सुधीर कोळवणकर, मेघनाथ सुळे, सरस्वती कदम, स्वाती वर्मा यांचा समावेश आहे.

ही सर्व मंडळी दैनंदिन कामकाजात आपला वेळ देत असून सभासदांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबद्ध राहिले आहेत. त्यामुळे संस्थेची प्रगती झपाट्याने होत आहे.

यापूर्वी काही विघ्नसंतोषी व्यक्तींनी त्यांचे चरण्याचे कुरण बंद झाल्यामुळे बदनामी करण्याचा तसेच जिवघेणे हल्ले करण्याचे प्रयत्न केले. पण संचालक मंडळाच्या मागे शासकीय कर्मचारी वर्गाची मोठी ताकद आहे. त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून त्याबद्दल विद्यमान संचालक मंडळ सर्व शासकीय कर्मचारी तसेच दि महाराष्ट्र मंत्रालय को - ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी संस्थेचे सभासद यांचे सदैव ऋणी आहे, असेही क्रेडिट सोसायटीचे चेअरमन रमेश लव्हांडे यांनी सांगितले.

## डाक महिला कर्मचाऱ्यांसाठी पाळणाघराची स्थापना

**मुंबई :** डाक विभागाच्या मुंबई क्षेत्रात प्रथमच दादर पूर्व, विलेपार्ले, चेंबूर आणि बोरिवली या चार प्रभागात शिशुसंगोपन केंद्राचे (पाळणघर) उद्घाटन पोस्ट मास्तर जनरल स्वाती पांडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यालयापर्यंत प्रवास करताना दररोज लागणारा प्रवासाचा वेळ तसेच दमवणारे कामाचे तास यातून भारतीय डाक मुंबई विभागातील कर्मचाऱ्यांना मानसिकदृष्ट्या प्रेरित आणि तणावमुक्त ठेवण्यासाठी शिशुसंगोपन केंद्र स्थापन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# चतुर्थश्रेणी कर्मचारी आंदोलनाच्या मानसिकतेत

पान १ वरुन ...

वरिष्ठ वर्ग ३ ची संघटना राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र यांची कार्यकारिणी २५ डिसेंबर २०२२ रोजी नाशिक येथे झाली होती. त्यावेळी वर्ग ३ व वर्ग ४ या दोन्ही संवर्गातील कर्मचाऱ्यांनी मिळून एकत्रित आंदोलन करण्याचा निर्णय देखील घेतला आहे. त्यामुळे शासनाने याबाबत आता गंभीरपणे लक्ष दिले पाहिजे. वारसाहक्क, विनाअट अनुकंपा, रिक्त जागा खासगीकरण, बदली कर्मचाऱ्यांचा प्रश्न, जुनी पेन्शन योजना आदी मागण्या कटाक्षाने आणि प्राधान्याने सोडवल्या पाहिजेत. मार्च मध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशन त्या कालावधीत एकत्रित दोन्ही संवर्गातील आंदोलन झाले तर त्याचा परिणाम कामकाजावर होईल. त्यासाठी मात्र कर्मचारी वर्ग अजिबात जबाबदार नसेल, हे आंदोलन अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून सुरु करण्याचेही संघटनांनी ठरवले आहे. तसा ठरवादेखील ७ जानेवारी २०२३ रोजी नाशिक येथे कार्यकारिणीच्या सभेत घेण्यात आला आहे.

राज्य कर्मचारी वर्गाची मोठी संख्या महाराष्ट्रात आहे. सुमारे ३.५ लाख चतुर्थश्रेणी कर्मचारीच आहेत. त्यात आता वर्ग ३ मधील कर्मचारी सहभागी होणार आहेत. त्यामुळे कामकाजावर नक्कीच परिणाम होणार आहे. शासन यापरकरणी दखल घेईल, असा विश्वास संघटनेचे नेते भाऊसाहेब पठाण यांनी व्यक्त केला आहे. आंदोलनात सर्व तालुका व जिल्हा स्तरावरील तसेच शहरी व ग्रामीण भागातील सर्व शासकीय कार्यालयातील कर्मचारी सहभागी होतील, असेही त्यांनी सांगितले.

## आवाहन

**'कर्मचारी टाइम्स'** मध्ये सर्व संवर्गातील शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संबंधीची माहिती, बातम्या तसेच घडामोडी यांची माहिति प्रसिद्ध करण्यात येते. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या बातम्या, घडामोडी, लेख प्रसिद्धीसाठी पाठवावे. जाहिरातीसाठी देखील आवाहन करण्यात येत आहे. **संपर्क संपादक, कर्मचारी टाइम्स, द्वारा राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, तळ मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२. भ्रमणध्वनी : ९८९०९१६५८८ ईमेल : karmacharitimes @gmail.com**

◆◆◆

## वर्गणीदारांसाठी सूचना

१. **'कर्मचारी टाइम्स'** अंकाची वार्षिक वर्गणी ३०० रुपये असून कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होऊ शकता.
२. वर्गणी मनीऑर्डर, धनादेश, डिमांड ड्राफ्ट, ऑनलाईन किंवा युपीआयद्वारे स्विकारली जाते. कार्यालयात प्रत्यक्ष रोख रक्कम भरूनही वर्गणीदार होता येते.
३. वर्गणी भरताना सोबत स्वतःचे नाव, पत्ता सुवाच्य अक्षरात नोंद करणे, ही वर्गणीदाराची जबाबदारी आहे.
४. मनीऑर्डर स्लीप भरताना त्यावर संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहावा.
५. **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयात वर्गणी प्राप्त झाल्यानंतर उशीरात उशीरा २ महिन्यांच्या आत आपला अंक सुरु करण्यात येतो.
६. **'कर्मचारी टाइम्स'** चे सर्व अंक दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बहुधा १ तारखेलाच पोस्टात दिले जातात. तेव्हा १५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास पुढील महिन्याच्या १ तारखेपूर्वी स्थानिक टपाल कचेरीत तक्रार नोंदवून त्या तक्रार प्रतीसह **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयास कळवावे. अंक पाठविण्यात येईल. तक्रारीत वर्गणीदार क्रमांक कळविणे आवश्यक आहे.
७. एक महिना उलटून गेल्यानंतर आलेल्या तक्रारी, टपाल कचेरीत तक्रार न नोंदविता आलेल्या तक्रारी, दूरध्वनीवरील तोंडी तक्रारी यांची नोंद घेतली जाणार नाही.
८. लेखी तक्रार नोंदवूनही दखल घेतली जात नाही, वारंवार कळवूनही पत्ता बदलला जात नाही, वर्गणीची मुदत संपण्यापूर्वी अंक बंद झाला, अशा स्वरुपाच्या तक्रारी आपण संपादकांकडे अवश्य करू शकता, त्याची दखल घेतली जाईल.
९. अर्धवट पत्त्यामुळे बऱ्याच वर्गणीदारांचे अंक परत येत असतात, यापुढे सलग तीन महिने अंक परत येतील, त्यांची वर्गणी संबंधित वर्गणीदार जोपर्यंत लेखी तक्रार नोंदवून पूर्ण पत्ता कळवत नाही, तोपर्यंत स्थगित ठेवण्यात येईल.
१०. **'कर्मचारी टाइम्स'** चे अंक किरकोळ विक्रीसाठी **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयात उपलब्ध असतात, याची नोंद घ्यावी.

**संपर्क** - राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९ नवीन प्रशासन भवन, तळ मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२.

**संपर्क** ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६

**ई मेल** karmacharitimes@gmail.com **वेबसाईट** www.karmacharitimes.com

## एमपीएससीची महाभरती

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या पदभरतीची घोषणा केली आहे. गट ब आणि गट क संवर्गातील विविध ८ हजार १६९ पदांसाठी ही भरती करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षार्थींसाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

आतापर्यंत दोन हजारापेक्षा जास्त पदांसाठी जाहिराती एमपीएससीने प्रसिद्ध केली नव्हती. आता पहिल्यांदाच ८ हजार १६९ पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. एकाच अर्जाद्वारे विविध पदांच्या भरती प्रक्रियेत उमेदवारांना सहभागी होता येईल, अशी माहिती सहसचिव सुनील अवताडे यांनी दिली आहे.

# प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांची माहिती मागवण्याचा प्रारंभ

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेत सामावून घेण्याबाबत शासन सकारात्मक आहे. त्यानुसार संबंधित विभागांना माहिती सादर करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नवी मुंबई महापालिकेने करारपद्धतीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती मागवली आहे.


नवी मुंबई महानगरपालिकेत करारपद्धतीवर ६ महिन्यांच्या नियुक्ती आदेशान्वये किमान वेतनावर गेल्या १५ वर्षांपासून जवळपास १५० कर्मचारी कार्यरत आहेत. बहुतांश कर्मचाऱ्यांचे अन्य ठिकाणी नोकरी करण्याचे वयदेखील निघून गेले आहे. राज्य शासनाने ५९ बारवी प्रकल्पग्रस्तांना विविध संवर्गात थेट नियुक्त केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार राज्य शासनाने संबंधित विभागांना माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

**'कर्मचारी टाइम्स'चे**
कार्यालयीन प्रतिनिधी
१. भाऊसाहेब पठाण
२. अशोक शिंदे
३. छाया करे
४. रिद्धी कुबल

# कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांचे स्मारक व्हावे !

**अनिल गुलाबराव गणाचार्य (कामगार नेते)**



कामगार आणि कष्टकरी वर्गाचे भीष्माचार्य असा जागतिक लौकिक असलेले आंतरराष्ट्रीय किर्तीचे कामगार नेते, कृतिशील विचारवंत, संसदपटू, संस्कृत पंडित, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती आंदोलनातील प्रमुख नेते तसेच प्रख्यात कम्युनिस्ट नेते अशी कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांची ओळख आहे.

ब्रिटिश काळात मिरत खटला, ऑल इंडिया ट्रेड युनियन (एआयटीयुसी) स्थापना, कामगारांचे विविध ऐतिहासिक संप व आपल्या देशात भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना या त्यांच्या कारकिर्दीतील ऐतिहासिक घटना आहेत. विधानसभेत कामगार विरोधात असलेल्या कायद्याच्या निषेधार्थ सर्वात अधिक वेळ भाषण देण्याचा उपक्रमही त्यांनी केला आहे.

त्यांनी आयुष्यातील १७ वर्षे स्वातंत्र्यासाठी तुरुंगवास भोगला. बँकांचे राष्ट्रीयकरण, बांगलादेश मुक्ती हा त्यांचा सल्ला होता. त्यांचे मुंबई आणि महाराष्ट्रात कुठेही नामस्मरण नाही, ही खेदाची बाब आहे. मुंबई व महाराष्ट्र ही त्यांची कर्मभूमी, नाशिक हे त्यांचे जन्मस्थान, परंतु नव्या पिढीत त्यांचे विस्मरण होऊ लागले आहे.

त्यामुळेच त्यांचे स्मारक मुंबई या महाराष्ट्राच्या राजधानीत व्हावे, यासाठी अनिल गणाचार्य यांनी प्रयत्न केला आहे. त्यासाठी मुंबई महापौर असताना किशोरी पेडणेकर, विरोधी पक्षनेता रवि राजा, स्थापत्य समिती अध्यक्ष दत्ता पोंगडे, मुंबई काँग्रसच्या अध्यक्षपदी असलेले भाई जगताप यांच्याकडे निवेदने देऊन परळ येथील मैदानाला कॉ. एस. ए. डांगे कामगार मैदान असे नामकरण करावे, असा प्रस्ताव अनिल यांनी केला आहे. मात्र महानगरपालिकेचा कार्यकाळ संपल्यामुळे व प्रशासक नेमणूकीमुळे प्रस्ताव प्रलंबित पडला आहे.

आर. जे. करंजीया यांच्या अध्यक्षपदाखाली कॉ. एस. ए. डांगे अमृत महोत्सव सत्कार समितीची स्थापना करण्यात आली. रोझा देशपांडे, प्रभाकर कुंटे, एल. एस. कारखानीस, बाळ सामंत, शालिनीताई पाटील, खुशवंत सिंग, अनंत काणेकर, मधु दंडवते, विद्याधर गोखले आदी मान्यवर या समितीत होते.

सर्वश्री वसंतदादा पाटील, शिरीष पै, महामहोपाध्याय दत्ता वामन पोतदार, रजनी पटेल, जयंतराव साळगांवकर, तात्यासाहेब सुळे, न. र. फाटक, ए. के. हंगल, डॉ. रवी बापट, रामराव आदिक, नीळकंठ खाडिलकर, अप्पा पेंडसे, बाळासाहेब देसाई, मनोहर कोतवाल, शामराव देशपांडे, भालचंद्र मराठे आदी दिग्गज मंडळींचा या सोहळ्यात सहभाग होता.

मुंबई गिरणी कामगार युनियनच्या वतीने या समितीची स्थापना केली होती. कॉ. डांगे यांनी गिरणी कामगारांसाठी अविरत कार्य केल्याबद्दल हा गिरणी कामगारांचाच गौरव आहे, या भावनेतून हे कार्य करण्यात आले. त्यानिमित्ताने राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कॉ. एस. ए. डांगे यांना ऑर्डर ऑफ लेनिन हा सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्यासमवेत हा पुरस्कार कॉ. सी. राजेश्वर राव यांनादेखील देण्यात आला. मात्र नंतरच्या काळात राव यांच्याशी मतभेद झाल्यामुळे कॉ. एस. ए. डांगे वेगळे झाले.

कॉ. एस. ए. डांगे यांचे वास्तव्य प्रभादेवी येथील नागुसयाजीची वाडी परिसरात होते. गिरणी कामगार वस्ती इथे मोठ्या प्रमाणावर होती. त्यामुळे जवळच एलफिन्स्टन रोड स्थानकाला 'कॉ. एस. ए. डांगे रेल्वे स्थानक' असे नाव द्यावे, अशी मागणी अनिल यांनी जाहीरपणे केली.

त्याचबरोबर त्यासाठी संबंधित रेल्वे प्रशासनाशी पत्रव्यवहार-देखील केला. पण आश्चर्य म्हणजे ही बाब आमच्या अखत्यारीत येत नाही, असे विलक्षण उत्तर देत प्रशासनाने गृह मंत्रालयाशी त्यासाठी संपर्क साधण्यास सांगितले तसेच महाराष्ट्र शासनाची शिफारस-देखील द्या, असे सुचविले.

महाराष्ट्र शासनाकडेदेखील अनिल यांनी पाठपुरावा केला. पण उत्तर आले नाही. नंतरच्या काळात स्थानिक आमदार सदा सरवणकर यांनी प्रयत्न करून प्रभादेवी असे या स्थानकाचे नामांतर करून घेतले.

लालबाग भारतमाता ते राणीबाग उड्डाणपूलाला कॉ. डांगे यांचे नाव देण्यात यावे, अशीही मागणी त्यांनी केली होती. त्यासाठी संबंधितांना भेटून विनंतीपत्रे-निवेदने सादर केली होती. मात्र त्याबाबतही उदासीनता दिसून आली.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने केंद्र सरकारने अंत्योदय मोहीम उपक्रम राबविला. देशातील ७५ जिल्ह्यांमधून नाशिक जिल्ह्यातील आदरणीय कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांची स्वातंत्र्यसैनिक म्हणून निवड करण्यात आली.

त्या अनुषंगाने त्यांचा जिल्हा परिषद, नाशिक यांच्या वतीने सन्मान सोहळा कार्यक्रम दिनांक २९ जुलै २०२२ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात श्री. अनिल यांनी पुन्हा महाराष्ट्र शासनास आठवण करून दिली की, त्यांची कर्मभूमी महाराष्ट्रात असूनही कॉ. एस. ए. डांगे यांचे स्मारक उभे करण्याच्या दृष्टीने काहीही करण्यात आलेले नाही. निदान त्यांच्या जन्मगावी करंजगाव. ता निफाड येथे काहीतरी स्मारक किंवा नाशिक येथे ते ज्या शाळेत शिकले, तेथे त्यांच्या स्मरणार्थ एखादी योजना राबविण्यात यावी.

कॉ. डांगे यांना माहीमच्या हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शेवटच्या दिवसांत त्यांची शुद्ध हरपली होती. त्यांची कन्या रोझाताई त्यांच्या जवळ असायच्या. त्यावेळी देशात लोकसभा निवडणूका वारे वाहत होते. काँग्रेस नेते राजीव गांधी यांचा त्यावेळी मुंबई दौरा होता. काँग्रेस उमेदवार शरद दिघे यांच्या प्रचाराची त्यांची धारावीत सभा होती.

त्यांना कॉ. एस. ए. डांगे यांच्या-विषयी समजल्यानंतर ते आपल्या व्यग्रतेतून वेळ काढत हिंदुजा रुग्णालयात पोहचले. त्यांच्यासोबत काँग्रेसचे नेते मुरली देवरा हे देखील होते. कॉ. एस. ए. डांगे यांच्या कानावर रोझाताईंचे शब्द पडले की, इंदिराजींचा मुलगा तुम्हाला बघायला आला आहे. इंदिरा हे शब्द कानावर पडल्यानंतर कॉ. एस. ए. डांगे यांचे त्या अवस्थेतदेखील डोळे काहीसे किलकिले झाले होते. त्यावेळी अनिल यांच्यासमवेत लिफ्टमध्ये राजीव गांधी यांची भेट झाली. कामगार नेते अशी ओळख मुरली देवरा यांनी करून दिली. यावेळी त्यांना मजदूर उत्कर्ष सभेची स्मरणिका भेट दिली.

विशेष म्हणजे त्या स्मरणिकेवर पहिल्या पानावर इंदिराजी व डांगे यांचे छायाचित्र होते. राजीव गांधी यांनी त्या वेळेतदेखील ही स्मरणिका चाळली आणि अनिल यांच्या कामाचे कौतुक केले.

राजीव गांधी यांची २१ मे १९९१ रोजी हत्या झाली आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे २२ मे १९९१ या दिवशी कॉ. एस. ए. डांगे यांचीही प्राणज्योत मालवली. हे दोन्ही नेत्यांचा अनिल यांच्यावर प्रभाव होता. राजीव गांधी यांच्यासमवेत यापूर्वी ते भेटले होते ते राजभवनावर. १९८६ ची गोष्ट. त्यावेळी ते भारताचे पंतप्रधान होते.

कॉ. एस. ए. डांगे हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे नेते होते. भारताच्या कामगार चळवळीत त्यांचे स्थान अग्रणी आहे.

कॉ. एस. ए. डांगे यांचे लढे हा त्यांच्या काळातील एक झंझावात असून त्यांनी कामगार चळवळीसाठी दिलेले योगदान विचारात घेता, त्यांचे स्मारकासाठी सकारात्मक राहिले पाहिजे. परंतु ठोस कार्यवाही किंवा उपाययोजना देखील कृतीत साकारली पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने ती आदरांजली ठरणार आहे.

◆◆◆

# शासकीय कर्मचारी आणि निवडणूक उमेदवारी

**आदित्य शिंदे**



आमदार रमेश लटके यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी ऋतुजा लटके यांना शिवसेना (ठाकरे) गटाच्या वतीने अंधेरी पूर्व विधानसभा निवडणूकीची उमेदवारी जाहीर झाली. त्यावेळी त्यांच्या उमेदवारी अर्जाच्या वेळी तांत्रिक मुद्दा पुढे आला होता आणि तो म्हणजे त्या मुंबई महानगरपालिकेत शासकीय सेवेत होत्या. त्या क वर्गातील कर्मचारी होत्या आणि त्यांचा राजीनामा मंजूर करण्यात आला नव्हता. यावेळी मोठा पेच निर्माण झाला.

शासकीय नियमानुसार राजीनामा स्विकारताना आयुक्तांपुढेही अडचणी आल्या होत्या. शेवटी प्रकरण न्यायालयात गेले. त्याचबरोबर मुंबईचे माजी पोलिस आयुक्त सत्यपाल सिंह यांना निवृत्त व्हायला २ वर्षांचा कालावधी शिल्लक होता. मात्र, त्यांना २०१४ सालाची लोकसभा निवडणूक लढवायची होती. म्हणून त्यांनी ३० जानेवारी २०१४ रोजी राजीनामा दिला. त्याचा राजीनामा त्यावेळी तत्काळ मंजूर करण्यात आला. त्यानंतर ते निवडणूकीत लढले, विजयी झाले, पुढे ते केंद्रात मंत्रीदेखील झाले.

सरकारी कर्मचारी यांनी निवडणूक लढविण्यासंदर्भात २०१४ मध्ये लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी सांगितले होते की, केंद्रीय नागरी सेवा निगम १९६४ नुसार सरकारी कर्मचारी स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा किंवा लोकसभा निवडणूक लढवू शकत नाहीत. त्यामुळे राजीनामा दिल्याशिवाय ऋतुजा लटके यांना निवडणूक लढवणे नियमानुसार शक्य नाही.

एखाद्या व्यक्तिकडे लाभाचे पद असेल तर तो निवडणूक लढवू शकत नाही. शासकीय कर्मचारी हे लाभाचे पद आहे. त्यामुळे तो कर्मचारी केंद्र किंवा राज्य सरकारचा असो, त्याला राजीनामा दिल्याशिवाय निवडणूक लढवता येत नाही. तसेच राजीनामा मंजूर झाल्यावरच निवडणूक लढवावी. त्यासाठी वेळेच बंधन नाही. काही महिने अगोदर राजीनामा द्यावा लागतो, असाही नियम नाही.

दी रिप्रेझेंटेशन ऑफ दी पिपल ॲक्ट १९५१ मधील तरतूदीनुसार हा नियम लागू होतो.

◆◆◆

# 'कर्मचारी टाइम्स' कर्मचाऱ्यांच्या हक्काचे व्यासपीठ

**(योगेश सगर)**



सारिका सोनवणे

**नाशिक: 'कर्मचारी टाइम्स'** हे वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांचे व्यासपीठ असून लवकरच ते त्यांचे लोकप्रिय मुखपत्र ठरेल, असा विश्वास राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या उपाध्यक्ष तसेच विभागीय संघटक सारिका सोनवणे यांनी शुभेच्छा देताना व्यक्त केला आहे.

कर्मचारी वर्गाच्या प्रश्नांची दखल इतर प्रसारमाध्यमांमध्ये अभावाने घेताना दिसून येते. त्यामुळे हा कर्मचारी वर्ग तसा वंचित राहिलेला आहे. अशावेळी त्यांच्या प्रश्नांबाबत, कामगिरी तसेच इतर घडामोडींसाठी त्यांचे हक्काचे व्यासपीठ ठरून त्याचा लौकिक वाढेल. त्यासाठी प्रत्येक शासकीय कर्मचारी वर्गाने त्यात आपला सहभाग दिला पाहिजे. शासकीय कर्मचारी वर्गात विशेषत: महिला वर्गानेही आपल्या घडामोडींबाबत, हक्कांबाबत या वृत्तपत्राच्या माध्यमातून जागरूक राहिले पाहिजे, असेही त्यांनी शुभेच्छा देताना सांगितले. कर्मचारी संघटनांना प्रभावशाली नेतृत्वाची परंपरा आहे. ही परंपरा कै. र. ग. कर्णिक साहेबांपासूनची ते आज चतुर्थश्रेणी संघटनांसाठी अहोरात्र करणाऱ्या भाऊसाहेब पठाण यांच्यापर्यंत आहे. त्यांच्या माध्यमातून केवळ संघटनाच नव्हे तर शासकीय यंत्रणेतील कर्मचारी वर्गासाठी सुरु करण्यात आलेले हे वृत्तपत्र हे किंबहुना देशात पहिले असावे. त्यांना प्रश्नांची जाण आहे, त्यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम नक्कीच लोकप्रिय होईल, असेही सारिका सोनवणे यांनी म्हटले आहे.



राजेंद्र अहिरे

'कर्मचारी टाइम्स' वृत्तपत्र कर्मचाऱ्यांच्या हक्काचे व्यासपीठ निर्माण होत असून कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न, समस्या आणि सुख, दुखातील प्रसंग यातून जनमानसापर्यंत पोहचणार आहे, या नियत कालिकाला संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातील नाशिक , धुळे , जळगाव, नंदुरबार आणि अहमदनगर या विभागातून सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने मी स्वागत करतो, असे प्रतिपादन राज्य सरकारी गट ड चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे नाशिक जिल्हा शाखेचे सरचिटणीस राजेंद्र अहिरे यांनी व्यक्त केले आहे.

मुंबई येथून प्रकाशित होणाऱ्या राज्य चतुर्थश्रेणी कर्मचारी गट ड मध्यवर्ती महासंघाचे नियतकालिकाचे उत्तर महाराष्ट्रातून जोरदार स्वागत होत आहे. महासंघाचे नाशिक जिल्हा शाखेचे सरचिटणीस राजेंद्र अहिरे यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी ही माहिती दिली.

या नियतकालिकाच्या स्वागताविषयी त्यांचे मनोगत जाणून घेतले असता राजेंद्र अहिरे यांनी सांगितले, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे नेते, प्रेरणास्थान र. ग. कर्णिक यांच्या प्रेरणेने भाऊसाहेब पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य चतुर्थश्रेणी कर्मचारी महासंघाचे हक्काचे व्यासपीठ **'कर्मचारी टाइम्स'** नियतकालिक प्रसिद्ध होत आहे.

या नियतकालिकाचे आम्ही उत्तर महाराष्ट्रातून जोरदार स्वागत करत आहोत. नियतकालिक **'कर्मचारी टाइम्स'** च्या प्रवासाला हार्दिक शुभेच्या देत असल्याचे यावेळी राजेंद्र अहिरे यांनी सांगितले.




• संपादक : एम. एम. उर्फ भाऊसाहेब पठाण • कार्यकारी संपादक : अशोक रामचंद्र शिंदे • प्रकाशक-मुद्रक : श्री. एम. एम. उर्फ भाऊसाहेब पठाण यांनी 'कर्मचारी टाइम्स' हे मासिक राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ साठी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीअल इस्टेट, केशवराव खाड्ये मार्ग, जेकब सर्कल, मुंबई ४०००११ येथे छापून राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२ येथे प्रसिद्ध केले. शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त. • संपर्क संपादकीय ९८९०९६५८८, ९८२१३७४६२६, जाहिरात : ९८९०९६५८८, ७९७२९२७०१५ वितरण : ९८९०९६५८८, ९५०३५७९५५२ ई मेल : karmacharitimes@gmail.com वेबसाईट : www.karmacharitimes.com (प्रेरणास्थान : आदरणीय कै. र. ग. कर्णिक, संस्थापक : भाऊसाहेब पठाण)